बुधवार, ३ ऑगस्ट २०२२
# रामप्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १७
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी/२
रायगडात पावसाची दडी; बळीराजा चिंतेत/५
मांडवा येथे ११ ऑगस्टला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा/८

## राष्ट्रकुल स्पर्धा : लॉन बॉल, टेबल टेनिसमध्ये भारताला 'सुवर्ण'



**बर्मिंगहॅम** : इंग्लंडच्या बर्मिंगहॅममध्ये सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने मंगळवारी (दि. २) दोन क्रीडाप्रकारांत सुवर्णपदके पटकाविली. आधी भारतीय महिलांच्या संघाने लॉन बॉस स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाला १७-१०च्या फरकाने मात देत सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर भारतीय पुरुष टेबल टेनिस संघाने अंतिम सामन्यात सिंगापूरचा ३-१ असा पराभव करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. भारतीय महिलांच्या लॉन बॉल संघातील रूपा रानी, नयनमोहिनी, पिंकी आणि लवली चौबे या चौघींनी कमाल कामगिरी केली. विशेष म्हणजे इतिहासात प्रथमच भारताने लॉन बॉलमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे, तर पुरुषांच्या टेबल टेनिसमधील सांघिक स्पर्धेत भारताने सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे.

# मंत्रिमंडळ विस्तार लवकरच -मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे दौऱ्यावर असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि. २) पीक कर्ज, धरणातील पाणी, कोरोना प्रादुर्भावाची सद्यस्थिती आणि बूस्टर डोस याबाबत आढावा घेतला. या आढावा बैठकीनंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत विरोधी पक्षांकडून उपस्थित करण्यात येत असलेल्या विविध प्रश्नांना उत्तरे दिली. या वेळी त्यांनी मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होणार असल्याचे सांगितले.



विरोधकांनी राज्यातील सरकार संवेदनशून्य असल्याची टीका केली होती. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले की, पूर परिस्थितीमध्ये मी आणि उपमुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीचा दौरा केला. हेलिकॉप्टरही तयार ठेवले होते. त्याचा वापर करून जाणार होतो, मात्र पाऊस एवढा होता की हेलिकॉप्टर जाऊ शकत नव्हते. तरी आम्ही रस्त्याने जाऊन पूर परिस्थितीचा आढावा घेतला.

राज्य सरकारच्या कामाविषयी माहिती देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी सरकार चांगल्या प्रकारे चालले आहे की नाही, असा सवाल विरोधकांना विचारला आहे. 'शेतकऱ्यांना ५० हजार रुपये देण्याची योजना थांबली होती. ती आम्ही कार्यान्वित केली. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती कमी केल्या,' असेही ते म्हणाले.

केंद्र सरकारशी संबंधित असलेले प्रकल्प आणि अन्य प्रश्नांच्या यादी तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्राच्या योजनांचा फायदा राज्याला झाला पाहिजे याकरिता या योजनांचा आढावा घेतला आहे. पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमधील जी कामे थांबली असतील त्या कामांना गती देण्याचे काम केले जाणार आहे. विकासकामांचा थर्ड पार्टी ऑडिट करण्यावर भर असणार आहे. त्याबद्दल सूचना दिल्या आहेत. वढू येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधीस्थळाच्या विकास आराखड्यातील कामांना कोणत्याही प्रकारची स्थगिती दिलेली नाही, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी स्पष्ट केले.

एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून ते जोरदारपणे कामाला लागले होते. आधीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे घरातून काम करीत होते, तर विद्यमान मुख्यमंत्री शिंदे विविध भागांचे दौरे करून नागरिकांच्या समस्या जाणून घेत आहेत.

## जवानांना वितरित करण्यात येणारा गहू हडप करण्याचा डाव उधळला

### जासईतील वेअरहाऊसमध्ये साडेचार कोटींचा साठा जप्त

**उरण : वार्ताहर**

देशाच्या सीमेवर दिवसरात्र शत्रूबरोबर लढणाऱ्या लष्करी जवानांच्या ताटातील घास हडप करून तो परदेशात पळवण्याचा डाव महसूल विभाग आणि पोलिसांनी उधळून लावला आहे. देशभरातील लष्करी जवानांना वितरित करण्यासाठी २३ हजार २९३ क्विंटल गहू घेण्यात आला होता. या गव्हाच्या ४६ हजार ७८७ गोणी चोरट्या मार्गाने परदेशात पाठवण्यासाठी जासई येथील इनलाईन वेअरहाऊसमध्ये साठवण्यात आल्या होत्या. महसूल विभाग आणि उरण पोलिसांनी इनलाईनच्या गोदामावर छापा मारून हा गहू जप्त केला असून या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देशभरात सार्वजनिक आणि लष्करासाठी वितरण करण्यात येणारा लाखो टन गव्हाचा साठा चोरट्या मार्गाने परदेशात पाठवला जाणार असल्याची माहिती नवी मुंबई पोलीस आणि महसूल विभागाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी उरण परिसरातील



गोदामांची झाडाझडती सुरू केली होती. या अंतर्गत जासई येथील इनलाईन वेअरहाऊसच्या गोदामावर शनिवारी छापा टाकला. गेल्या तीन दिवसांपासून पोलीस आणि महसूल अधिकाऱ्यांनी गोदामातील मालाची आणि कागदपत्रांची कसून तपासणी केली. त्या वेळी ही धक्कादायक बाब उघडकीस आली. तेथील बिले व कागदपत्रांची तपासणी केली असता त्यामध्ये अनेक उणिवा, अनियमिता आढळून आली. या गोदामात देशभरातील विविध राज्यांतील सरकारी नावे असलेल्या धान्याच्या हजारो रिकाम्या गोणींची बंडलेही आढळून आली आहेत. (पान २ वर..)

## महाराष्ट्रातील सत्ता संघर्षावर आज सुनावणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सत्ता संघर्षावर बुधवारी (दि. ३) सर्वोच्च न्यायालयाकडून फैसला होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेवरील याचिकेसह एकूण चार याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय राज्यातील सत्ता संघर्षावर काय निर्णय देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



सर्वोच्च न्यायालयात एकूण चार याचिकांवर सुनावणी होणार आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेवरही या वेळी सुनावणी होणार आहे. त्यातच शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल केली आहे. शिवसेना कोणाची हा निर्णय निवडणूक आयोगाला घेऊ द्या, असे शिंदे गटाने याचिकेत म्हटले आहे. त्यामुळे सुप्रीम कोर्ट घटनापीठाची स्थापना करणार का? की कोर्ट काही आदेश देणार याकडे सगळ्यांचे लक्ष आहे.

या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायमूर्ती एन. व्ही. रमणा, न्यायमूर्ती कृष्णा मुरारी आणि न्यायमूर्ती हेमा कोहली या तीन न्यायमूर्तींच्या घटनापीठापुढे होणार आहे. २० जुलैपासून शिवसेनेने आणि शिंदे गटाने दाखल केलेल्या चार याचिकांवर सुनावणी होणार आहे. मागच्या सुनावणीत कोणत्याही बाजूच्या आमदारांना अपात्र ठरवू नका, जैसे थे परिस्थिती ठेवा, असे आदेश सुप्रीम कोर्टाने दिले होते.



**पनवेल : जेएनपीए कंत्राटी कामगारांचा २७ महिने रखडलेला पगारवाढीचा करार झाल्याबद्दल कामगार नेते सुधीर घरत, सुरेश पाटील, मधुशेठ पाटील यांनी कामगारांसमवेत जेएनपीए जनरल कामगार संघटनेचे सल्लागार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली व त्यांचे आभार मानले.**

## निवडक

### 'अल कायदा'चा म्होरक्या जवाहिरीचा अमेरिकेकडून खात्मा

**काबूल** : दहशतवादी संघटना अल कायदाचा म्होरक्या अयमान अल जवाहिरीचा अमेरिकेने ड्रोन हल्ल्याद्वारे खात्मा केला आहे. जवाहिरी हा अफगाणिस्तानची राजधानी काबूलमध्ये तालिबानचा गृहमंत्री हक्कानीच्या घरात जवाहिरी लपून होता. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी त्याच्या मृत्यूच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

### केरळपाठोपाठ दिल्लीत आढळला मंकीपॉक्सचा आणखी एक रुग्ण

**नवी दिल्ली** : येथे राहणाऱ्या नायजेरियन व्यक्तीला मंकीपॉक्सचा संसर्ग झाल्याचे समोर आले आहे. दिल्लीत मंकीपॉक्सची लागण झालेली ही तिसरी व्यक्ती आहे. यासोबतच देशात मंकीपॉक्स रुग्णांची संख्या आता आठ झाली आहे. केरळमध्ये मंगळवारीच (दि. २) एका व्यक्तीला मंकीपॉक्सची लागण झाल्याचे निष्पन्न झाले असून आतापर्यंत केरळमध्ये एकूण पाच रुग्ण आढळले आहेत.

## पनवेल-उरणमध्ये मनसेला खिंडार

■ अनेक पदाधिकाऱ्यांचा एकनाथ शिंदे गटात प्रवेश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस या तिन्ही पक्षांना मोठा धक्का बसला असून नेते आणि पदाधिकारी शिंदे गटात दाखल होत आहेत. आता पनवेल, उरणमधील मनसैनिकांनीही शिंदे गटात प्रवेश केला आहे.

मनसेचे माजी रायगड जिल्हा अध्यक्ष अतुल भगत, माजी खारघर शहर अध्यक्ष प्रसाद परब यांच्यासह पनवेल, उरण तालुक्यातील अनेक पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. १) शिंदे गटात प्रवेश केला. मुंबईतील मलबार हिल येथील मुख्यमंत्री शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी हा पक्षप्रवेश कार्यक्रम झाला.

याआधी पनवेलमधील शिवसेनेचे महानगरप्रमुख रामदास शेवाळे, जिल्हा सचिव रूपेश पाटील, उपशहर प्रमुख मंगेश रानवडे, इम्तियाज शेख आदींनी शिंदे गटात प्रवेश केला होता. शिवसेनेपाठोपाठ आता मनसेला खिंडार पडले आहे.

(सविस्तर वृत्त पान ६ वर..)



## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांचा पनवेल मनपा क्षेत्रात पाहणी दौरा

### नागरी समस्यांची सोडवणूक करण्याचे आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील करवले, ओवे पेठ तसेच पनवेल शहरातील मस्जिद परिसरात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २) पाहणी दौरा केला. या वेळी त्यांनी नागरी समस्यांचा आढावा घेऊन त्या लवकरात लवकर सोडविण्यात येतील, असे आश्वासन दिले.



पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी केलेल्या पाहणी दौऱ्यावेळी करवले येथे रस्ते, गणपती विर्सजन घाट, अंगणवाडी; ओवे येथे रस्ते, पथदिवे; पेठ गावातील रस्ते, हायमास्ट, मलनिस्सारण वाहिन्या, पाण्याच्या लाईन यांसारख्या समस्यांची पाहणी केली. त्याचप्रमाणे पनवेल शहरातील दाऊदी बोरा जमात सिमेंट्री कब्रस्थान ट्रस्टच्या मस्जिद परिसरातील साफसफाई आणि गटारांवरील तुटलेल्या झाकणांची पाहणी केली. या दरम्यान त्यांनी करवले येथे पाणीपुरठा विभागाचे अभियंता श्री. चव्हाण यांच्यासोबत चर्चा केली.

या पाहणी वेळी माजी नगरसेवक हरेश केणी, भाजप युवा मोर्चाचे विनोद घरत, श्री. म्हात्रे, भाजप नेते प्रभाकर जोशी, सचिन वास्कर, इर्शाद शेख, जयदास तेलवणे, विशाल जोशी, संदीप वास्कर, दशरथ जोशी, अल्पसंख्याक मोर्चाचे मन्सूर पटेल, साजीद पटेल, रमझान शेख, एजाज पटेल, माणिक म्हात्रे, निर्दोष केणी, गोपीनाथ पाटील, वासुदेव माळी, संतोष पाटील, संतोष मढवी, लालचंद मढवी, योगेश पाटील, जितेश म्हात्रे, अभियंता संजय कटेकर उपस्थित होते. मस्जिद परिसर पाहणी वेळी सचिव एम. अलियासगर गोलवाला, इद्रीस शायर, एम. जोहर वोहरा, एम. मुर्तझा वोहरा, मोहम्मद वोहरा, अलीअकबर सारीवाला आदी उपस्थित होते.

## वरुणराजा पुन्हा बरसणार!

### ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये जोरदार पावसाचा अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

ऑगस्ट-सप्टेंबर या दोन महिन्यांच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यात देशात सरासरीच्या तुलनेत १०६ टक्क्यांपर्यंत पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. प्रामुख्याने दक्षिण कोकण आणि पूर्व विदर्भातील काही भाग वगळता राज्यात सर्वत्र या दोन महिन्यांत सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाचा अंदाज आहे.



हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी देशभरातील अंतिम टप्प्यातील पावसाचा अंदाज सोमवारी जाहीर केला. त्यानुसार संपूर्ण देशात ऑगस्ट आणि सप्टेंबर या कालावधीत ९४ ते १०६ टक्क्यांपर्यंत पावसाची शक्यता आहे. पश्चिम-मध्य भारत, उत्तर-पश्चिम भारत आणि दक्षिण भारतात बहुतांश भागात सरासरीच्या तुलनेत अधिक पाऊस होणार आहे. पूर्व-मध्य आणि ईशान्येकडील राज्यांत मात्र सरासरीच्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे.

हवामान विभागाने २०१८ ते २०२२ या कालावधीत नोंदविलेल्या निरीक्षणांनुसार कमी दाबाच्या पट्ट्यांची देशातील संख्या वाढली आहे, मात्र या पट्ट्यांचा दीर्घ कालावधी कमी झाल्याने कमी दिवसांत, कमी कालावधीत अधिक पाऊस होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निरीक्षण डॉ. महापात्रा यांनी नोंदविले. पुढील दोन महिन्यांत पावसावर परिणाम करणारी ला-निना स्थिती सर्वसामान्य असणार आहे. त्यामुळे त्याचा पावसावर परिणाम जाणवणार असल्याचेही डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले.

शेवटच्या दोन महिन्यांच्या टप्प्यात राज्यात बहुतांश भागात सरासरीच्या तुलनेत अधिक पावसाची शक्यता असली, तरी ऑगस्टमध्ये मात्र राज्यात पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता आहे. ऑगस्टमध्ये काही भागांत पाऊस सरासरी पूर्ण करणार नसल्याचे हवामान विभागाने पावसाच्या अंदाजाबाबत जाहीर केलेल्या नकाशांवरून दिसून येते.

## राऊतांच्या अटकेनंतर बाळासाहेब ठाकरेंच्या चालकाने वाटले पेढे

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना खासदार संजय राऊत यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली असून न्यायालयाने त्यांना ४ ऑगस्टपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. त्यानंतर मंगळवारी (दि. २) शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वाहनचालकाने दिल्लीत खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतली आणि पेढे वाटून आनंद व्यक्त केला. प्रकाश राजपूत असे या वाहनचालकाचे नाव आहे.

संजय राऊतांच्या अटकेवर बोलताना राजपूत यांनी खूप आनंद झाल्याची भावना व्यक्त केली तसेच राऊतांनी शिवसेना संपवण्याचे काम केल्याचा आरोप करीत आता ते २०२४पर्यंत तुरुंगातून बाहेर निघायला नको, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## 'नॅशनल हेराल्ड'च्या मुख्यालयावर ईडीचा छापा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेस पक्षाच्या हंगामी अध्यक्ष सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची चौकशी केल्यानंतर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राच्या मुख्यालयावर मंगळवारी (दि. २) छापा टाकला. नॅशनल हेराल्ड गैरव्यवहारप्रकरणी ईडीकडून दिल्लीतील अनेक ठिकाणी छापेमारी सुरू आहे.

नॅशनल हेराल्डच्या चौथ्या मजल्याची ईडीकडून झडती घेण्यात आली. याच मजल्यावर वृत्तपत्राचे कार्यालय आहे. ईडीचे अधिकारी मंगळवारी सकाळी १०च्या सुमारास नॅशनल हेराल्डच्या इमारतीत शिरले होते. बराच वेळ त्यांची छापेमारी सुरू होती.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी दिल्लीतील काँग्रेसच्या मालकीच्या नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राच्या कार्यालयासह १२ ठिकाणी ईडीने छापे टाकले आहेत. याशिवाय ईडीकडून कोलकाता येथील काही ठिकाणी छापे टाकण्याची शक्यता आहे.

नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने गेल्या आठवड्यात (२७ जुलै) सोनिया गांधी यांची तीन तासांहून अधिक काळ चौकशी केली होती. तत्पूर्वी ईडीने राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस नेते पवन बन्सल आणि मल्लिकार्जुन खरगे यांचीदेखील चौकशी केलेली आहे. जून महिन्यात सलग पाच दिवस ईडीने राहुल गांधी यांना चौकशीसाठी बोलावले होते.




श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं पाझरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. या वेळचं वातावरण अगदी तस्संच आहे. वरुणराजाही दमदार बरसला आहे. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...

श्रावण संपेपर्यंत मान्यवर कवींनी शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कवींनी आपली अप्रकाशित कविता छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल. -मुख्य संपादक

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक ७७३८१०६००९**

# जनहिताची कामे थांबणार नाहीत -मुख्यमंत्री शिंदे

## पुणे विभागातील विकासकामे व योजनांचा घेतला आढावा



**पुणे : प्रतिनिधी**

पुणे विभागातील जनहिताच्या विकासकामांसाठी कोणत्याही प्रकारे निधीची कमतरता भासू देणार नाही. जनतेच्या कामांसाठी क्रियान्वयनातील टप्पे कमी करून विकासकामे वेगाने पूर्ण करावी. विकासकामांसाठी प्रशासनाला शासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहिल, असे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात पाऊस, अतिवृष्टी, पीक पाहणी आणि विकासकामांबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस खासदार श्रीरंग बारणे, विभागीय आयुक्त सौरभ राव, विविध विभागांचे राज्य आणि विभागस्तरीय अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पूरग्रस्त भागातील नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम त्वरित पूर्ण करावे. दरडप्रवण गावातील तात्पुरते स्थलांतर केलेल्या नागरिकांना सर्व प्रकारच्या मूलभूत सुविधा देण्यात याव्यात. कृषि निविष्ठांची कमतरता भासू देऊ नये आणि निकृष्ठ बियाण्यांच्या बाबतीत विशेष लक्ष ठेवावे. पीकविमा योजनेचा लाभ शेतकऱ्यांना वेळेवर मिळावा यासाठी विमा कंपन्यांना सूचना देण्यात याव्या, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

कोविडची वर्धित मात्रा घेण्यासाठी नागरिकांच्या प्रबोधनावर भर द्यावा आणि व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात यावी. येणाऱ्या सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर लसीकरण शिबिरांचे आयोजित करावे.

बैठकीस माजी मंत्री तानाजी सावंत, माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार दिलीप मोहिते पाटील, माधुरी मिसाळ, संग्राम थोपटे, महेश लांडगे, सुनील कांबळे, अशोक पवार, चेतन तुपे, सुनील टिंगरे, भीमराव तापकीर, राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, संजय जगताप, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त राजेश पाटील, पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता, अंकुश शिंदे, विभागातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### हर घर तिरंगा अभियान यशस्वी करा

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित 'हर घर तिरंगा' कार्यक्रम घराघरात पोहचविण्यासाठी सर्व यंत्रणांचा सहभाग घ्यावा. घरावर तिरंगा फडकविण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.**

### पोषणयुक्त आहार वाटपाचा शुभारंभ

**पुणे जिल्हा परिषदेंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या वतीने अंगणवाडी केंद्रातून पोषणयुक्त आहार अंतर्गत हॉर्लिक्स वाटपाचा शुभारंभ मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यासाठी जिल्हा परिषदेने कंपन्यांचे सामाजिक उत्तरदायित्व अंतर्गत हिंदुस्थान युनिलिव्हरसोबत सामंजस्य करार केला असून कंपनी वर्षभर मोफत हॉर्लिक्स पुरवणार आहे.**

### कोरोनामुक्त गावांना पुरस्कार

**राज्य शासनाने सुरू केलेल्या कोरोनामुक्त गाव स्पर्धा योजनेंअंतर्गत माण, ता. मुळशी आणि सपकळवाडी, ता. इंदापूर या ग्रामपंचायतींनी कोविड व्यवस्थापनामध्ये केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल या गावांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.**

# रेवदंड्यातून पळालेला मुलगा पनवेलमध्ये सापडला

**पनवेल : वार्ताहर**

रेवदंडा येथून शाळेत जातो असे सांगून पनवेल या ठिकाणी पळून आलेल्या अल्पवयीन शालेय विद्यार्थ्याचा पनवेल पोलिसांनी एसटी स्टॅन्ड परिसरात शोध घेतला. त्याला पालकांकडे सुपूर्द केल्यावर पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.



रेवदंडा पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक अशोक थोरात यांनी पनवेल तालुका वरिष्ठ निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना, एक १३ वर्षीय मुलगा सकाळी शाळेत जातो असे सांगून घरातून निघाला, पण शाळेत न जाता तो पनवेल येथे एसटीने आला असल्याची माहिती दिली. ही माहिती प्राप्त होताच पनवेल पोलिसांच्या पथकाने बसस्थानक परिसरातून शाळेच्या गणवेशात असलेल्या मुलाला ताब्यात घेतले. त्याची विचारपूस केली असता त्याने रागाच्या भरात आपण आलो असल्याचे सांगितले. पोलिसांनी तत्काळ रेवदंडा पोलीस स्टेशनला कळविले. त्यांनी ही माहिती मुलाचे आई, वडील व शाळेतील शिक्षकांना दिली. त्यांनी पोलीस ठाण्याचे आभार मानले.

# एमआयडीसीने विकलेल्या पालिकेच्या भूखंडांची चौकशी करावी

## आमदार गणेश नाईक यांचे मुख्यमंत्री आणि उपमख्यमंत्र्यांना पत्र



**नवी मंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतर केलेले सुविधा भूखंड एमआयडीसी आणि सिडको प्रशासन विकत असून या गंभीर प्रकाराची चौकशी करण्याची मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली आहे.

आयुक्त अभिजित बांगर यांच्याबरोबर मंगळवारी (दि. २) झालेल्या बैठकीत आमदार नाईक यांनी या प्रकरणी एमआयडीसीचे विभाग अधिकारी बाबर यांची भेट घेणार आहे, अशी माहिती दिली. नवी मुंबईकरांना नागरी सुविधा देण्यासाठी राखीव असलेले महापालिकेचे सुविधा भूखंड विकण्याचा सपाटा एमआयडीसी आणि सिडकोने लावला असून ही विक्री तत्काळ थांबवावी, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रान्वये केली आहे.

नवी मुंबईतील पावणे औद्योगिक क्षेत्रातील भूखंड क्र.ओएस १६ उ (भूखंड क्र. सी ११/१२), दिघा येथील कृष्णा बिजनेस पार्क शेजारचा महापालिकेच्या भूखंडावर सिव्हरेज लाईन आणि सिव्हरेज केंद्राचे काम सुरू आहे. तरीही एमआयडीसीने या भूखंडाची विक्री परस्पर केली आहे. रबाळे तलावाजवळ आंबेडकर नगर दिवानाका या ठिकाणी मलउदंचन केंद्र आणि स्मशानभूमीकरीता राखीव भूखंड एमआयडीसीने महापालिकेकडे हस्तांतरित करोवा याकरिता वारंवार एमआयडीसीकडे पत्रव्यवहार करूनही हेतूपूर्वक दुर्लक्ष करून हा भूखंडदेखील विकला आहे.

वाशी सेक्टर १६ येथे पालिकेने नाल्यावर अनेक किऑस्क बांधले. हे बेकायदा किऑस्क सध्या मोडकळीस आले आहेत. त्याची चौकशी करावी, अशी मागणीदेखील आमदार नाईक यांनी केली.

### घोटाळेबाज अधिकारी आणि दलालांवर कारवाईची मागणी

**महापालिकेच्या मालकीचे आणि सिडको तसेच एमआयडीसी महामंडळांकडे महापालिकेने मागणी केलेल्या सुविधा भूखंडांची विक्री तत्काळ थांबविण्याच्या सूचना या दोन्ही प्राधिकरणांना द्याव्यात. त्याचबरोबर या भूखंडाची परस्पर विक्री करणाऱ्या अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही आमदार गणेश नाईक यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्रान्वये केली आहे.**

## मुंबईतून ७०० किलो प्लास्टिक जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पालिकेच्या दोन वर्षांपासून थंडावलेल्या प्लास्टिकविरोधी कारवाईला वेग आला आहे. मार्केट आणि लायसन्स विभागाने १ जुलैपासून पुन्हा धडाक्यात कारवाई सुरू केली आहे. १ ते ३१ जुलैपर्यंत पालिकेच्या पथकाने मुंबईत १८ हजारांपेक्षा अधिक ठिकाणी भेट देत ६७० किलोपेक्षा जास्त प्लास्टिक जप्त केले. कारवाई दरम्यान १७७ जणांकडून आठ लाख ८० हजारांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

मॉल, मार्केट, दुकाने आणि फेरीवाले अशा ठिकाणी कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांची विक्री, वापर आणि उत्पादन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे. पालिकेने आतापर्यंत महिनाभरात केलेल्या कारवाईत ६७० किलोवर प्लास्टिक जप्त केले.

## उरणमध्ये आदिवासींना खाऊवाटप

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी, बातमीदार**

भारताच्या राष्ट्रपतीपदी पहिल्यांदाच जनजाती आदिवासी समाजातील द्रौपदी मुर्मू या राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्याबद्दल वनवासी कल्याण आश्रम उरणतर्फे तालुक्यातील कोप्रोली, विंधणे, जांभुळपाडा, केळ्याचा माळ, चांदायली या अदिवासी वाडींवर खाऊवाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी सामाजिक कार्यकते कै. कान्हा कृष्णा पाटील परिवार सारसोळे, आमदार महेश बालदी मित्रमंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले. वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष मनोज ठाकूर, कुणाल शिसोदिया, ॲड. आकाश शाह, रमेश फोफेरकर, दीपक गोरे, वामन म्हात्रे, सुनंदा वाघमारे, बेबी कातकरी यांनी विशेष मेहनत घेतली.

उरण तालुका केमिस्ट असोसिएशनचे गिरीश परिहरिया, बळीराम पेनकर आदी उपस्थित होते. आकाश शहा यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. चिरनेर ग्रामपंचायतीचे सदस्य रमेश फोफेरकर यांनी उपस्थितांचे तसेच आमदार महेश बालदी यांनी वनवासी बांधवांसाठी फिरता दवाखाना सुरू केल्याबद्दल आभार मानले.



# नेरूळ येथील खेळाचे मैदान वाचविण्यासाठी भाजप आक्रमक

## मैदान बचाव आंदोलनाचा इशारा



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडकोने खेळासाठी राखीव ठेवलेले मैदान विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त करण्याचा महापालिकेने घेतलेल्या निर्णयाविरोधात मैदान बचाव आंदोलन करण्याचा इशारा भाजप युवामोर्चाचे नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष दत्ता घागळे यांनी दिला आहे.

सिडकोने सिवूड्स नेरूळ, सेक्टर-४६ए येथे खेळासाठी मैदान राखीव ठेवले आहे. हे मैदान नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. संभाजी महाराज खेळाचे मैदान असे नामकरण करण्यात आले आहे. स्थानिक नगरसेवकांनी जुलै २०१९मध्ये झालेल्या महापालिकेच्या सभेत मैदानाच्या मध्यभागी व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉलसारखे इन्डोर खेळासाठी विकसित करण्यासंदर्भात ठराव मंजूर करून घेतला. ठराव मंजूर करतांना सार्वजनिक वापरास परवानगी देण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला आहे.

दोन वर्षांपूर्वी सभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी आता पालिकेकडून केली जात आहे. सिडकोने राखीव ठेवलेल्या मैदानात कबड्डी क्रिकेट खोखो आदी मैदानी खेळासह दहीहंडी, मंगळागौर, गणेशोत्सव असे सण साजरा केले जातात. त्यामुळे महापालिकेने मैदानावरील विकास थांबवावा, यासाठी दत्ता घागळे यांच्या नेतृत्वाखाली आयुक्त अभिजित बांगर यांची भेट घेऊन, मैदान नागरिकांसाठी राखीव ठेवावे अशी मागणी केली. यासाठी नागरिकांच्या स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यानंतरही पालिकेने निर्णय बदलला नाही तर भाजप आंदोलन करेल असे त्यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०२वी जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.



विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे व शिक्षक, पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेवराव ठाकूर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर व सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे पर्यवेक्षक दीपक भर्णुके, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित गीत सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. अनेक विद्यार्थ्यांची साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्याविषयी भाषणे झाली. इयत्ता नववी अ या वर्गाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले. या कार्यक्रमात सुमारे ३० विद्यार्थ्यांनी उत्साहाने वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. त्यात प्रेषित किरण लांडगे या अंध विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत सादर केले, तर स्मित कुंदन मोकल याला उत्कृष्ट बाणेदार कणखर वक्तृत्वासाठी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर यांनी १०१ रुपये, प्राचार्या साधना डोईफोडे १०१ रुपये, लिपिक मढवी यांच्याकडून १०१ रुपये, पर्यवेक्षक दीपक भर्णुके यांच्याकडून १०१ रुपयांचे असे एकूण ५०० रुपयांचे बक्षीस मिळाले. त्याचप्रमाणे इयत्ता १०वीच्या वर्गाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा महतीचा एक पोवाडा गाऊन दाखवला. कार्यक्रमाचे अध्यक्ष डोईफोडे यांनी भाषणात दोन्ही महापुरुषांचा गुणगौरव केला.

पान १ वरून

## जवानांना वितरित करण्यात येणारा गहू हडप करण्याचा डाव उधळला

गोदामात अवैधरीत्या ५० किलोच्या ४६ हजार ७८७ गव्हाच्या गोणी ठेवण्यात आल्या असल्याचे तपासणीत आढळून आले. या गव्हाचे वजन २३ लाख २९ हजार ३५० किलो इतके असून किंमत चार कोटी ६७ लाख ८७ हजार इतकी आहे. या प्रकरणी इनलाईन वेअरहाऊस गोदामाचे मालक प्रवीण अंचल आणि व्यवस्थापक सुमन कुमार या दोघांविरुद्ध उरण पुरवठा निरीक्षक सोमनिंगा बिराजदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे यांनी केलेल्या बंडानंतर केंद्रातदेखील शिवसेना खासदारांनी वेगळा गटनेता स्थापन केल्यानंतर शिंदे गटाचे खासदार मंगळवारी (दि. २) पहिल्यांदा गृहमंत्री अमित शाहांच्या भेटीला गेले. त्यांनी या वेळी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा या मागणीचे निवेदन शाहांना या वेळी देण्यात आले आहे.

मराठीच्या सन्मानासाठी राज्यसभेत देखील वारंवार ही मागणी पुढे केली जात होती. दरम्यान शिंदे गटाकडून केंद्र सरकारकडे ही पहिली मागणी केली जात आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.


| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-19 /22-23/ Rfx No.7000024222 | Work of chimney height rising of tower legs on 400KV Nagothane- Dabhol 1 & 2 ckt under 400 kV line Maint s/dn Nagothane | **Rs. 24.19** | **09.08.2022 up to 23.59hrs** |

**EMD Rs.** 1% of Estimate cost & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/ Contact Person**: Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**






पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. ३ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे

कोरोना प्रतिबंधक लसीकरण

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर ■ ५. सीकेटी हायस्कूल, न्यू पनवेल
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ७. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ १०. आंबेडकर भवन, पनवेल
- ११. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

■ पेंधर ■ रोहिंजण ■ मुर्बी ■ कोयनावेळे ■ पालेखुर्द ■ धामोळे

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**



MAHAVITARAN

**TENDER NOTICE**

Following Tender is invited from Eligible Bidders under Pen Circle Raigad District. The Details are as given below-

| Sr. No. | Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission | Estimated Cost (Rs.) | Amount of EMD (Rs.) | Tender Cost Fee |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Tender No. SE/PC/ Tech/2022-23/T-13 | Tender for repairing of Outdoor type 22 KV Metering type CT's, PT's & Sub-station type CT's & PT's under O&M Circle, PEN. | Dt. 3/08/2022 To Dt. 12/08/2022 Bid Submission Date: 12/08/2022 upto17:00 hrs. | Rs. 10,00,000/- | Rs. 10,000/- | Rs. 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website https://etender.mahadiscom.in/eatApp/

Sd/-
(PRO No-99) SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

# कळंबोलीतील समस्या सोडविणार

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आश्वासन; स्त्री शक्ती फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा





**पनवेल : वार्ताहर**

कळंबोलीमधील सर्वसामान्य नागरिकांना नेहमीच भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर स्त्री शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्ष विजया कदम यांच्यासह सामाजिक संस्थेचे पदाधिकारी यांनी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी चर्चा करून त्या समस्या प्रामुख्याने मांडल्या तसेच लवकरात लवकर या समस्या सोडविण्याची मागणी केली. या वेळी कळंबोलीतील समस्या सोडविणार असल्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

कळंबोलीतील रस्ते व गटारांच्या समस्या, कळंबोली कामोठे जोडरस्ता ते तलावापर्यंतच्या रस्त्याचे विस्तारीकरण, कामोठे बस स्टॉप ला जाण्यासाठी पीडब्लूडीमार्फत ब्रिज खाली रस्त्याचे व्यवस्थित काम व रात्री विद्युत रोषणाई, रस्त्यावर गाड्या पार्किंग या सम व विषम तारखेप्रमाणे करून आवश्यक तिथे पार्किंग झोन, पनवेल महापालिकेतील नगरसेवकांनी आपापल्या प्रभागात चांगले काम करावे म्हणून आदर्श प्रभाग व आदर्श नगरसेवक निवड, जनता दरबार, मराठा आरक्षण आंदोलनातील निर्दोष व्यक्तींचे गुन्हे रद्द करण्याबाबत, आपात्कालीन व्यवस्थेच्या निर्मिती तसेच या वेळी कळंबोलीतील राम मंदिराची दुरुस्ती करण्याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी या मंदिराच्या बांधकामासाठी लागणारे साहित्य लवकरच उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

याचबरोबर इतर विषयावर सकारात्मकपणे मार्गी लावण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार प्रशांत ठाकूर यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना दिले. या वेळी विजया कदम, शुभांगी निर्मळे, भरत कोरडे, राम मंदिर अध्यक्ष संतोष मोकल, महादेव क्षीरसागर, भिमराज खामकर, पांडूरंग जाधव, गणेश लाड, सुशांत कापरे आदी उपस्थित होते.

दरम्यान, शिष्टमंडळाने आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छासुद्धा दिल्या.

# आमदार महेश बालदींनी घेतली सिडको प्रशासनासोबत बैठक

## प्रलंबित असलेल्या विषयांवर सकारात्मक चर्चा

**उरण : रामप्रहर वृत्त**

उलवे, द्रोणागिरी व करंजाडे नोडमधील काही प्रलंबित विषय सोडविण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आमदार महेश बालदी यांनी सिडको एमडी संजय मुखर्जी यांना पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये सिडकोकडून प्रलंबित प्रश्नांवर लवकरच कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.

आमदार महेश बालदी यांनी निवेदनात मांडलेल्या विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. यामध्ये उरण-पनवेल महामार्ग हस्तांतरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हा रस्ता सिडकोकडे हस्तांतरित करणे. उलवे मस्जिद विषयी, उलवे से.१९ प्लॉट नं ३४ (९०० चौ.मी.) या भूखंडावर ३०० चौ.मी दफनभूमी व ६०० चौ.मी वर मस्जिद होण्याबाबत त्वरित निर्णय होणे. नवी मुंबईतील आगरी कोळी भवन व उलव्यातील भूमिपुत्र भवनच्या धरतीवर करंजाडे नोड मध्ये कराडी समाजासाठी भूखंड देणेबाबत. उरण – पनवेल तालुक्यामधील सिडको अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीच्या घन कचरा नियोजनेच्या व्यवस्थेबाबत बैठकीत चर्चा झाली. यासर्व प्रश्नांवर लवकरच कार्यवाही करण्याकडे सिडकोचा प्रयत्न असेल, असे आश्वासन सिडको एमडी यांच्याकडून देण्यात आले.

या बैठकीला आमदार महेश बालदी यांच्यासह वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाजप युवा नेते निलेश खारकर, शैलेश भगत, राकेश गायकवाड तसेच सिडको एमडी, मुख्य अभियंता, आरोग्य अधिकारी, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता आदी उपस्थित होते.



# लोकनेते रामशेठ ठाकूर गरीब, गरजूंचे आशास्थान -जे. एस. घरत

**उरण : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर हे गरीब, गरजूंचे आशास्थान आहेत, असे विचार उरण येथील ज्येष्ठ साहित्यिक व सावित्रीबाई फुले झोपडपट्टीतील बाल संस्कार मंदिर शाळेचे आश्रयदाते जे. एस. घरत यांनी व्यक्त केले. ते आगरी साहित्य परिषद व आचार्य अत्रे कट्टा उरण यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमान्य टिळक स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

घरत म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी वर्तमानपत्र काढून जनजागृती केली व शाळा कॉलेज काढून सर्वसामान्य लोकांची शिक्षणाची सोय केली, तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हेदेखील लोकमान्य टिळकांच्या कार्याचा आदर्श घेऊन शाळा-कॉलेज काढून शिक्षणसेवेचे कार्य करीत आहेत. त्याचप्रमाणे गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य व गणवेश देण्याचे कार्य करीत असून लोकनेते रामशेठ ठाकूर हे गरीब, गरजूंचे आशास्थान आहेत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भाजपचे उरण तालुका चिटणीस रायगडभूषण नरेश म्हात्रे व जे. एस. घरत यांनी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

घरत पुढे म्हणाले की, माझ्यासारखे अनेक कार्यकर्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा आदर्श घेऊन सेवाभावी कार्य करीत आहेत. आचार्य अत्रे कट्टाचे अध्यक्ष धनंजय गोंधळी आजारी असल्यामुळे कार्यक्रमास उपस्थित राहू शकले नाहीत, परंतु त्यांनी दिलेल्या शुभेच्छांचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास दोन्ही संस्थांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# जप्तीच्या दोन बोटींचा लिलाव

**पनवेल :** एनआरआय पोलीस ठाण्यामार्फत दोन बोटी जप्त करण्यात आल्या होत्या. या बोटींचा लिलाव करण्याबाबत नियंत्रक शिधावाटप, अधिकारी मुंबई यांनी आदेश दिले आहेत. जप्त बोटी उलवे जेटी येथे ठेवल्या आहेत. बोटींचा लिलाव करायचा असल्याने इच्छुकांनी नमूद बोटी उलवे जेटी बेलापूर येथे बघून १२ ऑगस्ट २०२२ रोजी बेलापूर पोलीस आयुक्तांचे कार्यालय येथे सकाळी ११ वाजता लिलाव प्रक्रियेसाठी हजर रहावे, असे आवाहन मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई व वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह भोसले यांनी केले आहे.

# पनवेलमध्ये रक्षाबंधन सणानिमित्त हातमाग व यंत्रमाग कापड विक्री

## माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रक्षाबंधन सणानिमित्त सोलापूर येथील भाऊराया हॅण्डलूम यांच्यावतीने हातमाग व यंत्रमाग कापड विक्री व प्रदर्शन पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये भरवण्यात आले आहे. या प्रदर्शन व विक्री केंद्राचे उद्घाटन पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले.



पनवेल महापालिकेच्या कार्यालयासमोरील गोखले हॉलमध्ये भारवण्यात आलेल्या प्रदर्शन हे १ ते १६ ऑगस्ट पर्यंत सुरू राहणार आहे. या प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, माजी नगरसेविका रूचिता लोंढे, नीता माळी, निता मंजुळे, प्रसाद म्हात्रे, संदीप पाटील, प्रितम म्हात्रे, श्वेता म्हात्रे, गोवर्धन कोडम, योगेश पोलन, दीपक गुंडू, बाळू कोडम, श्रीनिवास दुरसा, मधुकर सुरम, लक्ष्मण उडता आदी उपस्थित होते.

या वेळी प्रदर्शनाचे प्रमुख पांडुरंग पोलन यांनी या हातमागा विणकाम करून तयार केलेले कपडे हे चांगल्या दर्जाचे असतात त्यामुळे या प्रदर्शनाचा पनवेलकरांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# सीकेटी विद्यालयात नागपंचमी साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात नागपंचमीचा सण साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, सर्व सहकारी शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापक श्री. मानकर यांच्या हस्ते नागाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इयत्ता दुसरी (यमुना) वर्गातील अनन्य अतुल कुलकर्णी या विद्यार्थिनीने नागपंचमी सणाची माहिती सांगितली. साप हा शेतकऱ्यांचा मित्र कसा आहे, याबद्दल मुलांना माहिती सांगण्यात आली. अशाप्रकारे नागपंचमी सण उत्साहात साजरा करण्यात आला.



# कामोठ्यातील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नागपंचमी आणि मंगळागौर उत्साहात



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

श्रावणातील पहिला सण म्हणजे नागपंचमी आणि मंगळागौर. कामोठे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थिनींना या सणांची माहिती व्हावी व त्याचा आनंद घेता यावा म्हणून हे दोन्ही सण विद्यालयात साजरे करण्यात आले.

यामध्ये सर्व विद्यार्थिनी पारंपरिक पोशाख परिधान करू आल्या होत्या. सुरुवातीला नागपंचमी का साजरी केली जाते, याविषयी काही विद्यार्थिनींनी मनोगतातून माहिती सांगितली. नंतर मंगळागौरची पूजा करून पारंपरिक खेळ, झिम्मा, फुगडी, नृत्य सादर करून उपस्थित विद्यार्थिनींनी यात सहभाग घेतला.

या सर्व कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. एन. मोरे, एस. डी. पाटील, एम. व्ही. म्हात्रे, एस. डी. थोरात, व्ही. व्ही. फडतरे, व्ही. बी. पाटील, ए. ए. पाटील या महिला शिक्षकांनी केले.



**नवीन पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने सेक्टर १३ येथील कालिका माता मंदिर याठिकाणी माजी सभापती ॲड. वृषाली वाघमारे यांच्या प्रयत्नाने बुस्टर डोस कॅम्प राबविण्यात आले. या वेळी माजी उपमहापौर चारुशिला घरत, भाजप महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, हेमांगी वाघमारे, भारती घरत, जय बजरंग मित्र मंडळाचे अध्यक्ष विनोद वाघमारे, राजेंद्र ठोकळ, ॲड. जितेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते. या कॅम्पचा लाभ सेक्टर १३च्या रहिवाशांनी घेतला.**

# सीकेटी महाविद्यालयात कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे सोमवारी (दि. १) एक दिवसीय नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.





या कार्यशाळेसाठी संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आर.टी.सी.सी.एस. कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. गायकवाड, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव, कला शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी.एस. पाटील तसेच आय.क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव उपस्थित होते.

प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व महाविद्यालयाविषयी माहिती दिली. आय.क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांनी आय. क्यू. ए. सी. क्लस्टर इंडियाचे सल्लागार आणि आंध्र प्रदेशमधील ए.एन.आर. कॉलेज, गुडीवाडाचे माजी प्राचार्य डॉ. एस. संकर यांचा परिचय दिला. डॉ. गडदे यांनी शिक्षक हे शिक्षण धोरण २०२० आणि विद्यार्थी यांच्यातील मध्यस्थ आहेत, असे प्रतिपादन केले.

या उपक्रमांतर्गत डॉ. एस. संकर यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबाबत आढावा दिला. त्याचबरोबर एन.ई.पी २०२०साठी संस्थात्मक तयारी, नॅक श्वेतपत्रिकेच्या मसुद्यावर चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेत डॉ. एस.संकर यांनी शालेय शिक्षण, उच्च शिक्षण यावर लक्ष केंद्रीत करणारी इतर प्रमुख क्षेत्रे यावर चर्चा केली.

सूत्रसंचालन प्राध्यापक एस. एन. परकाळे यांनी केले, तसेच कला विद्याशाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# कामोठे उड्डाणपुलावर शिवशाहीची जीपला धडक; चालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

सायन-पनवेल महामार्गावर मंगळवारी (दि. २) कामोठे उड्डाणपुलावर शिवशाही बसचा विचित्र अपघात झाला. या अपघातात शिवशाही बस समोरील पीकअप बोलेरोला जाऊन आदळली. या वेळी बसमध्ये १४ प्रवासी प्रवास करत होते. या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सर्व प्रवाशी सुखरूप असून पिकअप बोलेरोमधील चालक मात्र किरकोळ जखमी झाला आहे.

शिवशाही (एमएच ०४ जेके ५७८१) बस साताऱ्याहून बोरिवलीला चालली होती. ही बस मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग संपल्या नंतर कामोठे उड्डाणपुलावर आली. कामोठे उड्डाणपुलावर आल्यानंतर काही सेकंदातच शेजारून चाललेली पिकअप बोलेरो शिवशाही बसच्या समोर आली, ही पिकअप बोलेरो समोर आल्याचे पाहून, अपघात टाळण्यासाठी प्रसंगावधान दाखवत शिवशाही बसचालकाने ब्रेक दाबला, तरीही वेगामुळे बस बोलोरेला जाऊन धडकली. या नंतर शिवशाही बस, उड्डाणपुलावरील रस्त्याकडील संरक्षक कठड्यावर जाऊन आदळली आणि थांबली यामुळे मोठा अनर्थ टळला.

प्रवेश देणे सुरू
(शैक्षणिक वर्ष २०२२-२३)
15 Celebrating 15 Years of Excellence 2007 - 2022
Sub Fire Officer Course
Diploma Fire Technology & Safety Management
Fireman Course

६ महिने व १ वर्ष कालावधी चे प्रशिक्षण अभ्यासक्रम
आता पनवेल मध्ये
पात्रता १० वी/१२ वी पास/ ग्रॅडयुएट
Asian Institute of Fire Safety
In Association With Our Monitoring, Assessment & Certification Body
MSME - Technology Development Centre, Meerut
(Ministry of Micro, Small & Medium Enterprises, Government of India)
3800+ Students | 3100+ Job Placements
8928307320, 9082677278
2nd Floor, Laxmi Public School, Near Sukapur Malewadi Bus Sop, Sukapur, New Panvel-410206
www.asianfiresafety.com

## संपादकीय

# समजुतदारपणाच महाग!

ज्या मुद्यावर विरोधी पक्षांनी संसदेचे कामकाज दीर्घ काळ रोखून धरले होते, त्या महागाईवर अखेर लोकसभेमध्ये विनाअडथळा चर्चा पार पडली. अर्थात त्यातून काही ठोस निष्पन्न होण्यासारखे नव्हतेच. सध्या देशातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. कुठल्याही मुद्यावर सकारात्मक भूमिका घ्यायचीच नाही असा जणू संकल्प विरोधकांनी केला आहे. अशा परिस्थितीत संसदेतील चर्चा विसंवादाने व्यापलेलीच असणार हे उघड होते.

**भारतातील आर्थिक परिस्थिती गंभीर रूप धारण करत असून अर्थव्यवस्था मंदीच्या खाईत लोटली जात असल्याचा आरडाओरडा विरोधकांनी लोकसभेतील चर्चेच्या वेळी केला. या सगळ्या परिस्थितीला मोदी सरकारच जबाबदार आहे असा आरोपही करण्यात आला. महागाई आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर मोदी सरकार सपशेल अपयशी ठरल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. अर्थात विरोधकांनी केलेल्या टीकेला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आकडेवारीनिशी दिलेले उत्तर पुरेसे बोलके आहेच, पण विरोधक किती नकारात्मक टोकाला पोहोचले आहेत याचेही ते पुरावे देणारे ठरले. जागतिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही महागाईचा दर सात टक्क्यांच्या आत ठेवण्यात मोदी सरकारला यश आले. गेल्या काँग्रेसप्रणित संयुक्त पुरोगामी आघाडीच्या काळात हाच महागाईचा दर दोन अंकी होता हे देखील सुनावण्यास अर्थमंत्र्यांनी कमी केले नाही. मुळात मंदी या शब्दाचा अर्थशास्त्रातील अर्थ विरोधकांनी समजून घ्यायला हवा. मंदी याचा अर्थ उणे विकास दर. भारतात ती स्थिती आलेली नाही. शिवाय, परकीय चलनाचा साठादेखील भारताकडे पुरेसा आहे. कोविडचे थैमान आणि नंतर पेटलेले रशिया– युक्रेन युद्ध यामुळे अनेक देशांची अवस्था आर्थिक आघाडीवर दयनीय झाली आहे. भारताचे तसे नाही. आपला देश मंदीच्या खाईत लोटला गेल्याची ओरड विरोधकांतर्फे सुरू असतानाच उत्पादनाचे आकडे उत्साहवर्धक होत होते. वस्तूसेवा कर संकलनाच्या आकड्यांनी तर विक्रमी झेप दाखवली. शेअर बाजारानेदेखील काही कारंजी उडवून या उत्साहात भर घातली. एकंदरीत भारताच्या आर्थिक स्थितीविषयी घबराट माजवण्यासारखे सध्या तरी काही नाही. अर्थात याचा अर्थ देशात सारे आलबेल आहे असाही कुणी काढू नये. भारतातील इंधन दर आजही चढ्या पातळीवर आहेत आणि त्याचे चटके सर्वसामान्य जनतेलाच बसत आहेत. साध्या स्वयंपाकाच्या गॅस सिलेंडरसाठी १ हजार रूपयांहून अधिक रक्कम मोजावी लागते. गॅसच्या चुलीवर रोजच चढवाव्या लागणाऱ्या डाळी, भाज्या यांच्याही किंमती आवाक्याच्या बाहेर जात आहेत. महिन्याचे बजेट कोलमडू लागले आहे. या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करावे तरी कसे? महागाईला अटकाव करण्यासाठी रिझर्व्ह बँक सातत्याने व्याजदर वाढवत आहे, परंतु तो काही एकमेव उपाय नव्हे. विकासाच्या विशिष्ट टप्प्यावर पोहोचलेल्या आणि पुरेशा सुदृढ अर्थव्यवस्थांच्या बाबतीत व्याजदर वाढवण्याचा उपाय लागू पडतो. आपला देश अजुन तितका सुदृढ झालेला नाही. शिवाय सध्याच्या महागाईची कारणे ही पुरवठा साखळ्यांच्या विस्कळीतपणात आहेत. त्याचा मोदी सरकारच्या धोरणांशी काही संबंध नाही. कमकुवत झालेल्या पुरवठा साखळ्या पूर्ववत करण्याची पराकाष्ठा केंद्र सरकार करत आहे, परंतु त्याला वेळ लागतो. हे समजून घेण्याचा समजुतदारपणा विरोधीपक्षांच्या नेत्यांकडे नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. समजुतदार विरोधीपक्ष हा उत्तम लोकशाहीचा महत्त्वाचा घटक आहे. भारतात मात्र तो महाग झाला आहे.**

# सैन्याधिकारी पालकांच्या मुलीची एक आगळी देशसेवा!

कार्तिकी, वय वर्ष अवघं १७, इयत्ता बारावीची विद्यार्थिनी. इथपर्यंतची ही ओळख सर्वसाधारणपणे इतर विद्यार्थ्यांचीही बऱ्यापैकी अशीच असू शकते, मात्र कुमारी कार्तिकी संतोष महाडिक या मुलीची ओळख इतरांपेक्षा नक्कीच वेगळी आहे, सर्वांना प्रेरणादायी आहे.

कार्तिकीचे बाबा सैन्याधिकारी होते, तर आईदेखील सैन्याधिकारी आहे. महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यामधील आरे या गावचे सुपुत्र शहीद कर्नल संतोष महाडिक हे ४१ राजस्थान रायफल्सचे कमांडिंग ऑफिसर होते. त्यांना देशाच्या शत्रूशी लढताना दि. १७ नोव्हेंबर २०१५ रोजी वीरमरण प्राप्त झाले. त्यावेळी कार्तिकी अवघी १० वर्षांची होती. या कुटुंबावर मोठे आभाळ कोसळले, मात्र शहीद कर्नल संतोष महाडिक यांच्या पत्नी स्वाती संतोष महाडिकदेखील कणखर बाण्याच्या. सैन्याधिकारी पती शहीद झाल्यानंतर रडत न बसता त्यांनी अख्ख्या जगासमोर महाराष्ट्राच्या इतिहासातील राजमाता जिजाऊंच्या लढाऊ बाण्याचा आदर्श ठेवला. स्वाती महाडिक यांनी संरक्षण प्रशासनाकडे दाद मागितली आणि एका शहीद सैन्याधिकाऱ्याची पत्नी पहिल्यांदा एक सैन्याधिकारी बनण्याचा इतिहास घडला. तोदेखील स्वकर्तृत्वावर, सैन्याधिकारी बनण्यासाठीच्या सर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन आणि त्यानंतरचे सर्व खडतर प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करून!

असा आदर्शवत लढाऊ बाणा रक्तातच असलेल्या लढाऊ आईबाबांची लाडकी लेक कार्तिकी वेगळी कशी बरे असू शकेल. सैन्याधिकारी आई-वडिलांचे देशप्रेमाचे संस्कार लाभलेली कार्तिकी शालेय जीवनापासूनच अष्टपैलू. इयत्ता ७वीत असल्यापासूनच तिने भरतनाट्यम् हा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर लोकप्रिय असलेला नृत्यप्रकार आत्मसात करण्यास सुरुवात केली. जसे जसे दिवस पुढे पुढे जाऊ लागले तसे तसे कार्तिकी कठोर मेहनत घेत भरतनाट्यम्मध्ये पारंगत होऊ लागली. आणि आता कार्तिकी तिच्या आई-बाबांसारखीच आपल्या भारतमातेचे नाव उज्ज्वल करण्यासाठी सज्ज झालीय. तेही आंतरराष्ट्रीय स्तरावर.

युरोपातील स्कॉटलंड या देशात एडिनबर्ग या ठिकाणी १९४७ पासून सांस्कृतिक महोत्सव भरविला जातो. ज्यामध्ये देशविदेशातील विविध



प्रकारच्या कलांचे प्रदर्शन उत्तमोत्तम कलाकारांकडून सादर केले जाते. कोरोनाच्या जागतिक संकटामुळे गेली तीन-चार वर्षे हा सांस्कृतिक महोत्सव आयोजित होऊ शकला नव्हता. नजीकच्या काळात म्हणजेच २०१८ साली या महोत्सवाच्या माध्यमातून जगभरातील तीन हजार ५४८ कलांचे ५५ हजार सादरीकरणे एडिनबर्ग शहरातील ३१७ विविध ठिकाणी सादर करण्यात आली. प्रत्येक वर्षी ऑगस्ट महिन्यात हा आंतरराष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक महोत्सव स्कॉटलंड या देशात भरविला जातो. हा कला महोत्सव तब्बल २५ दिवस सुरू असतो. यावर्षी हा महोत्सव ५ ऑगस्टला सुरू होऊन २९ ऑगस्टपर्यंत सुरू राहिल.

अशा या आंतरराष्ट्रीय पातळीवरील अत्यंत मानाच्या सांस्कृतिक महोत्सवात आपल्या कार्तिकीची भरतनाट्यम् नृत्यकलेतील अरंगेत्रम् हा विशेष प्रकार सादर करण्यासाठी निवड झाली आहे. तिच्यासोबत तिच्या सहकारी निकिता आणि अनन्या यादेखील असणार आहेत. चेन्नई येथील कलाक्षेत्र फाईन आर्ट्स या संस्थेच्या गुरू सी. के. राजलक्ष्मी आणि पंडित राजेंद्र गंगणी यांचे मोलाचे मार्गदर्शन या सर्वांना मिळाले आहे.

३० जुलै रोजी कार्तिकी आपल्या डेहराडून येथील शाळेत आपली कला सादर केली असून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात ती आपली कला स्कॉटलंड या देशातीलमधील एडिनबर्ग या शहरात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक महोत्सवात सादर करील. या वयात पितृछत्र हरविलेल्या भारतीय विद्यार्थिनीने आपल्या देशाचे, आपल्या शाळेचे या महोत्सवात प्रतिनिधित्व करण्याची स्वकर्तृत्वाने संधी मिळविणे, या यशाचे शब्दात वर्णन करणे तसे कठीणच आहे. एक प्रकारे कार्तिकीने वीरमरण पत्करलेल्या आपल्या वडिलांना आणि आता सध्या सैन्यात सैन्याधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या आपल्या आईला आपल्या कर्तृत्वाने जणू कडक सलामीच दिली आहे.

कार्तिकी आणि तिच्या सहकाऱ्यांना संपूर्ण भारत देशवासियांकडून लाख लाख शुभेच्छा..! जय हिंद..!

**-मनोज शिवाजी सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड-अलिबाग

# आपल्या कलागुणांना जपा...

तू फार सुंदर लिहतोस, तू फार सुंदर बोलतोस, तू अभ्यासात हुशार आहेस, तू खूप सुंदर चित्र काढतोस, तू खूप सुंदर खेळ खेळतोस, तुझ्यात नेतृत्व गुण आहेत, असे बऱ्याचदा आपण बऱ्याच मित्रमैत्रिणींना म्हणत असतो. नक्कीच चांगल्या कामाची स्तुती व्हायलाच हवी पण कुणीतरी आपल्याही कामाची स्तुती करायला पाहिजे अशी किमान एक तरी कला आपल्यामध्येसुद्धा अवगत असायला हवी असे मला वाटते, परंतु आपण अनेकदा इतरांची स्तुतीच करत राहतो पण आपल्यातील कलागुणांचे काय? हा विचार अनेकजण करीत नाही.

एखादी कला, एखादे कौशल्य का महत्वाचे आहे याबद्दल सांगताना पु. ल. देशपांडे लिहतात की, उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचे शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीने करा. पण तेवढ्यावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प, खेळ यातल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवेल, पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचे हे सांगून जाईल. या चार ओळींमध्ये पु. ल नी अख आयुष्याचे गूढ सांगितलेले आहे.

बऱ्याचदा आपण ताणतणावामध्ये आयुष्य जगत असतो. पण त्यातून बाहेर निघण्यासाठी कोणताही मार्ग भेटत नाही. मित्रांशी बोलू शकत नाही, भीती असते, पण एखादी कला आपल्यामध्ये अवगत असेल तर ती कला आपल्याला नक्कीच अशा कठीण प्रसंगातून बाहेर काढू शकते. त्यामुळे आपली आवड जपा, कलागुणांना वाव द्या. लोक काय म्हणतील याचा विचार करू नका. कारण आज जी माणसे आपल्यावर बोट दाखवतात तीच माणसे उद्या आपला बोट धरू शकतात. त्यामुळे किमान एक तरी कला आपल्या अंगी असावी..

आपण कोण आहोत? आपला जन्म कशासाठी झाला आहे? आपल्याला काय करायचे आहे? आपले ध्येय काय आहे? आपल्यातील गुण-दोष काय आहेत? अशा प्रश्नांची उत्तरे आयुष्यात जगतांना आपल्याकडे असतील तर नक्कीच असामान्य व्यक्तीमत्व होण्यापासून आपल्याला कुणीही थांबवू शकत नाही. पण त्या आधी स्वतःला ओळखणे खूप गरजेचे आहे. अशक्य वाटणाऱ्या गोष्टी करुन बघा. सुरुवातीला चुका होतीलच, पण जो चुकांतून शिकतो तोच पुढे जातो हेही तितकेच खरे.

आज एखाद्याची ओळख आजूबाजूच्या लोकांना कशी होते तर त्याच्या कर्तृत्वामुळे, त्याच्यातील कलेमुळे. कला ही अशी एकमेव गोष्ट आहे की, ज्याच्यामुळे माणूस मरणानंतरही जिवंत राहू शकतो. त्यामुळे कला, कौशल्य विकसित करा.

स्वतःला ओळखा. कधीही स्वतःला कमी समजू नका, जो समोरचा व्यक्ती करू शकतो ते आपण सुद्धा करू शकतो. गरज आहे फक्त थोडी हिंमत करायची. एकदा हिंमत केली ना, करुन बघितले ना तर खरं सांगतो या जगात अशक्य अशी कोणतीही गोष्ट नाही.

**-सुरज पि. दहागावकर, चंद्रपुर**



## बदलते तंत्रज्ञान



# गुगल मॅप देणार तुमच्या सुखरूप असण्याची माहिती

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्याला हवे असलेले ठिकाण मोबाइलवर टाईप करून सर्च केले की, लगेच मिळते. माहिती नसलेले ठिकाण सहजासहजी मिळणे शक्य झाले ते गुगल मॅपमुळे. आपल्याला हव्या असलेल्या पण रस्ता माहिती नसलेल्या ठिकाणी सहज पोहचण्यासाठी सर्वात जास्त वापरल्या जाणारे टूल म्हणजे गुगल मॅप, मात्र आता गुगल मॅपमध्ये काही महत्त्वाच्या फिचर्सची भर पडली आहे. ज्यामुळे तुम्ही बाहेर पडले तरी तुम्ही सुखरूप असल्याची माहिती तुमच्या जवळच्या व्यक्तींना मिळत राहिल.

आतापर्यंत गुगल मॅपवर हव्या त्या ठिकाणी लोकेशन सेट करीत पोहचणे, नव्या मार्गांचा शोध घेणे तसेच वेगवेगळी ठिकाणे एक्सप्लोअर करता येणे यांसारख्या गोष्टी शक्य होत्या, मात्र गुगल मॅपमध्ये आलेल्या नव्या फिचरच्या मदतीने आता एखाद्या ठिकाणी तुम्ही पोहोचल्याची किंवा निघाल्याची माहिती तुमच्या जवळच्या व्यक्तिंना किंवा कुटुंबियांना देऊ शकता. तुमचे लाईव्ह लोकेशन शेअर करण्याबरोबरच आता तुम्ही एखाद्या ठिकाणी पोहचल्यावर किंवा तेथून निघाल्यावर तुमच्या कुटूंबियांना किंवा जवळच्या व्यक्तींना सतर्क करण्यासाठीच्या सूचना सेट करू शकता.

१. या फिचरमुळे तुमच्या जवळची व्यक्ती कधी आणि कुठे याची माहिती तुम्हाला असेल, तसेच ती व्यक्ती सुखरूप निघाल्याची किंवा पोहचल्याची माहिती तुम्हाला मिळाल्याने तुमचे समाधान होईल.

२. याचे उत्तम उदाहरण द्यायचे झाल्यास तुमचे मित्रमंडळी किंवा कुटुंब एखाद्या ठिकाणी जाणार असेल आणि त्यांनी त्या ठिकाणाचे लोकेशन आधीच तुम्हाला शेअर केले असेल, तर तुम्ही त्या ठिकाणाच्या पत्त्यासाठी सूचना सेट करू शकता.

३. यामुळे तुमचे मित्रमंडळी किंवा कुटुंब त्या ठिकाणी कधी पोहोचले ते तुम्ही बघू शकता, तसेच ते कधी त्या ठिकाणावरून निघाले याचीही सूचना तुम्ही सेट करू शकता. या फिचरचा लाभ तेच घेऊ शकतात ज्यांनी जाण्याआधी त्यांचं लोकेशन तुम्हाला शेअर करीत सहमती दिली असेल.

# वैज्ञानिक प्रगतीचे केंद्र अणुऊर्जा आयोग

भारताचे प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांना वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवून राष्ट्राची प्रगती साधायची होती. या विचारातूनच त्यांनी ३ ऑगस्ट १९४८ रोजी अणुऊर्जा आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या निर्मितीमुळे अणुऊर्जा संपन्न देश म्हणून प्रगती करू लागला.

आयोगाचे पहिले अध्यक्ष म्हणून डॉ. होमी भाभा यांची नेमणूक झाली. अणुऊर्जेपासून वीजनिर्मिती, अन्नधान्य उत्पादन वाढवणे व ते टिकवणे, यासाठी प्रगत तंत्रज्ञान उभारणे, नॅनो तंत्रज्ञान विकसित करणे अशी अणुऊर्जा आयोगाची उद्दिष्टे होती. १९५६मध्ये या विभागाने अणुऊर्जेवर चालणारी भारताची पहिली अणुभट्टी 'अप्सरा' कार्यान्वित केली.

१९६९मध्ये अणुऊर्जेपासून विद्युत निर्मिती करण्यासाठी मुंबईजवळ तारापूर येथे अणुशक्ती केंद्राची स्थापना झाली. थोरियमचा विद्युत निर्मितीसाठी उपयोग साध्य करण्यासाठी तामिळनाडू राज्यात कल्पकम येथे रिॲक्टर रिसर्च सेंटर सुरू करण्यात आले. अणुऊर्जेच्या विकासात रियाक्टएर्सची भूमिका महत्त्वाची असते. अणुशक्तीच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या जड पाण्याचे कारखाने वडोदरा, ताल्चेर, तुतीकोरीन, कोटा आदी ठिकाणी उभारले आहेत.



अणुभट्ट्यांसाठी जड पाण्याचे देशांतर्गत मोठ्या प्रमाणावर उत्पादन व संशोधन करण्यासाठी जड पाण्याचे उपक्रम या संस्थेची उभारणी करण्यात आली. पुढे याच संस्थेचे मोठ्या प्रमाणात जलमार्ग असे नामकरण झाले.

नागरी अणुऊर्जाने २०१७मध्ये २,४८८ तेरा वॅट तास (टीडब्ल्यूएच) वीज पुरविली, जी जागतिक वीज निर्मितीच्या सुमारे १०

## निमित्त

टक्के एवढी होती आणि जलविद्युत नंतरचा दुसरा सर्वात कमी कमी कार्बन उर्जा स्रोत होता. एप्रिल २०१८पर्यंत, ४४९ नागरी विखंडन रिएक्टर आहेत. जगात, ३९४ गीगावॉट (जीडब्ल्यू) च्या संयुक्त विद्युत क्षमतेसह येथे ५८ अणुऊर्जा अणुभट्ट्या निर्माणाधीन असून १५४ अणुभट्ट्यांची योजना आखण्यात आली असून त्यांची संयुक्त क्षमता अनुक्रमे ६३ जीडब्ल्यू आणि १५७ जीडब्ल्यू आहे. वीज युरेनियम आणि प्लुटोनियमच्या विभक्त विखंडनाने तयार होते. विभक्त क्षय प्रक्रिया रेडिओआइसॉपॉप थर्मो इलेक्ट्रिक जनरेटरसारख्या कोनाडा अनुप्रयोगांमध्ये वापरली जातात. फ्यूजन पॉवरमधून वीज निर्मिती आंतरराष्ट्रीय संशोधनाच्या केंद्रस्थानी आहे.

जानेवारी २०१९पर्यंत आणखी ३३७ अणुभट्ट्यांचा प्रस्ताव होता. निर्माणाधीन बहुतेक अणुभट्ट्या आशिया खंडातील तिसऱ्या अणुभट्ट्या आहेत. अणू विभाजन केल्यानंतर होणाऱ्या स्फोटात प्रचंड ऊर्जा निर्माण होते. या ऊर्जेला अणुऊर्जा म्हणतात. या अणुऊर्जेचा उपयोग अनेक प्रकारे करून घेतला जातो. याच ऊर्जेचा उपयोग करून प्रचंड विध्वंस करू शकणारा अणुबॉंब बनवला गेला आहे.

**-साभार विकीपिडीया**

(छाया : सुधीर नाझरे)




**मुरूड : कोकणातील नांगरणी बैलांच्या स्पर्धा हा शेतकऱ्यांचा आवडीचा खेळ. शेतातील ढोपराभर चिखलात वाऱ्याच्या वेगाने बैलांना धावत नेणे हे सामान्य माणसाचे काम नाही. ही एक कला आहे. पळताना नांगर हातातून न सोडता स्पर्धा पूर्ण करण्याच्या जिद्दीला सलाम!**

## आरोग्य प्रहर



# रिकाम्या पोटी जिऱ्याचे पाणी प्यायल्यास 'या' समस्या होतील दूर

जर तुम्हाला निरोगी आणि सुदृढ राहायचे असेल, तर तुम्ही रिकाम्या पोटी जिऱ्याचे पाणी पिऊ शकता. जिऱ्यामध्ये असे अनेक पौष्टिक घटक आढळतात, जे आरोग्यासाठी खूप उपयुक्त आहेत, तर दुसरीकडे जिऱ्याचे पाणी आरोग्याला अनेक समस्यांपासून वाचवू शकते. या लेखाद्वारे सांगणार आहोत की, रिकाम्या पोटी जिऱ्याचे पाणी पिण्याचे आरोग्याला काय फायदे आहेत.

-ज्या लोकांना ॲसिडिटी किंवा पोटदुखीचा त्रास आहे त्यांनी रिकाम्या पोटी जिऱ्याचे पाणी प्यायल्यास त्यांच्या या दोन्ही समस्या दूर होतात, तसेच जिऱ्याचे पाणी सूज आणि अपचनाच्या समस्येपासूनही आराम देते. जिऱ्याच्या पाण्याने पचनक्रियाही वेगवान होऊ शकते.

-जर तुम्ही वजन कमी करण्यासाठी नवीन उपचार घेत असाल तर जिऱ्याच्या पाण्यानेही तुम्ही वजन अगदी सहज कमी करू शकता. हे पाणी चयापचय गतिमान करते, तसेच चरबी जाळते. अशा स्थितीत शरीरात साठलेली अतिरिक्त चरबीही काढून टाकली जाऊ शकते.

-पावसाळ्यात आपली प्रतिकारशक्ती मजबूत करणे खूप गरजेचे आहे. जिऱ्यामध्ये फायबर आढळते, जे केवळ रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करीत नाही, परंतु जर तुम्ही नियमितपणे जिऱ्याचे पाणी प्यायले तर माणूस अनेक समस्यांपासून दूर राहू शकतो.

-जिऱ्याच्या पाण्यात पोटॅशियमही मुबलक प्रमाणात आढळते. अशा परिस्थितीत जेव्हा एखादी व्यक्ती नियमितपणे जिऱ्याचे पाणी पिते, तेव्हा त्याद्वारे रक्तदाब नियंत्रित ठेवता येतो. जर तुम्ही उच्च रक्तदाब, कमी रक्तदाबाचे बळी असाल तर तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तुमच्या आहारात जिरे पाणी घेऊ शकता.

-रात्रीच्या वेळी दोन चमचे जिरे ग्लासभर पाण्यात भिजवावे आणि सकाळी उठल्यावर उकळून गाळून घ्यावे. पाणी गाळून उरलेले जिरे चावून खावे. याचं सेवन रोज केल्यास शरीरातील कोणत्याही भागातील अनावश्यक चरबी शरीरातून बाहेर पडेल. शक्यतो जिरे हे तांब्याच्या भांड्यात भिजवावे कारण तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायलानेही वजन कमी होते.

# रायगडात पावसाची दडी

**बळीराजा चिंतेत**



**अलिबाग : प्रतिनिधी**

जुलै महिन्याच्या मध्यात जोरदार कोसळल्यानंतर आता रायगड जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. गेले आठ दिवस ऊन पडत आहे. त्यामुळे भात रोप करपण्याची भीती व्यक्त केली जाते आहे. बळीराजाची चिंता वाढली आहे. अशीच परिस्थिती पुढील काही दिवस राहिल्यास भाताची रोप सुकण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्यात यंदा पाऊस उशिरा दाखल झाल्याने शेतकरी चिंतेत होता. जून महिन्यात सरासरीच्या ५८.९६ टक्के पाऊस पडला होता. मात्र जुलै महिन्याच्या मध्यात पावसाचे जोरदार आगमन झाले. सुमारे १०दिवस मुसळधार पावसाने रायगड जिल्ह्याला झोडपून काढले होते. जुलै महिन्यात १४६०.२५मिमी पाऊस पडला. जुलै महिन्याच्या सरासरीच्या १२५.९६टक्के पाऊस पडला. समाधानकारक पाऊस पडल्यामुळे शेतीची कामे वेगात झाली. जिल्ह्यात भात लावणीची कामे पूर्ण झाली आहेत.

सध्या भात रोपे फुटव्याच्या अवस्थेत आहेत. परंतु पासासाने दडी मारली आहे. जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतली आहे. त्यामुळे तापमानात बदल झाला असून, उष्णतेत काही अंशी वाढ झाली आहे. पाऊस गायब होवून उन्हाचा तडाखा वाढला आहे. येत्या काही दिवसात पाऊस पडला नाही, तर रोपे सुकून करपण्याची शक्यता असल्याने शेतकरीवर्ग धास्तावला आहे.

सध्या पाऊस पडत नसला तरी जमिनीत ओलावा आहे. त्यामुळे सध्यातरी भात रोपांना भीती नाही. रोप फुटव्याच्या अवस्थेत आहेत. कुठेही रोगाचा प्रादुर्भाव नाही. आता पाऊस हावा, पण कमी हवा. जास्त पाऊस पडल्यास रोपे कुजू शकतात, असे रायगडचे कृषी उपसंचालक डी. एस. काळभोर यांनी सांगितले.

> **कृषी विभागामार्फत १ ते १५ ऑगस्ट या कालावधीत किड रोग निर्मूलन मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये गावोगावी शेतकर्‍यांच्या बैठका घेणे, शेती शाळा घेणे, शेतकर्‍यांच्या शेतावर शास्त्रज्ञांच्या भेटी आयोजीत करणे, इत्यादी उपक्रमातून शेतकर्‍यांमध्ये किड रोग व त्यांच्या उपाययोजनांविषयी जनजागृती करण्यात येत आहे.**
> **-डी. एस. काळभोर, कृषी उपसंचालक, रायगड**

(छाया : जितेंद्र जाधव)



## रोह्यात अन्नदान, वृक्ष लागवड

### भाजप कामगार मोर्चा अध्यक्ष विलास डाके यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप कामगार मोर्चाचे रोहा तालुका अध्यक्ष तथा राजमुद्रा फाउंडेशनचे सल्लागार विलास डाके यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (दि. २) भुवनेश्वर अदिवासीवाडीतील ५० कुटुंबातील सदस्यांना अन्नदान करण्यात आले. तसेच रोठ बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयालगत वृक्ष लागवड करण्यात आली.

भारतीय जनता युवा मोर्चाचे दक्षिण रायगड अध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, सरपंच नितीन वारंगे, उपसरपंच वेदिका डाके, युवा मोर्चाचे रोहा तालुका अध्यक्ष राजेश डाके, शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, भाजप महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस श्रद्धा घाग, सदस्या वैभवी भगत, रितेश घाग, अश्विनी घाग यांच्यासह अदिवासी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मुरुड-आगरदांडा मुस्लीम समाज आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठीशी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांना अलिबाग विधानसभा मतदार संघात वाढता पाठिंबा मिळत आहे. मुरुड-आगरदांडा मुस्लिम समाजाच्या पदाधिकार्‍यांनी नुकताच आमदार महेंद्र दळवी यांची सदिच्छा भेट घेऊन पाठिंब्याचे पत्र दिले.

आगरदंडा मुस्लिम समाजाच्या पदाधिकार्‍यांनी नुकताच राजमळा येथील आमदार महेंद्र दळवी यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेतली व त्यांना पाठिंब्याचे पत्र दिले.



या वेळी आगरदंडा मुस्लिम समाज अध्यक्ष व उपसरपंच नजीरशेठ खतिब, उपाध्यक्ष अफजल सोंडे, फिरोजखान घलटे, सत्तार गजगे यांच्यासह मुस्लिम समाज बांधव तसेच आमदार दळवी समर्थक ऋषिकांत डोंगरीकर उपस्थित होते.

## नेरळ येथील कॉलेजमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

### ▮ रायगड हॉस्पिटलच्या पथकाकडून सेवा ▮ ८०हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला लाभ

**कर्जत : बातमीदार**

विद्या मंदिर मंडळाच्या नेरळ येथील मातोश्री सुमती चिंतामणी टिपणीस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात रायगड हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरच्या पथकाने ८०हून अधिक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. या वेळी आवश्यकता असलेल्या विद्यार्थ्यांवर डिकसळ येथील रायगड हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली.





महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि रायगड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. मंडळाचे कोषाध्यक्ष विवेक पोतदार यांच्या हस्ते फित कापून या शिबिराची सुरुवात करण्यात आली. रायगड हॉस्पिटलचे डॉ. सचिन डोरे, डॉ. निलेश साळवे, डॉ. सबिहा इनामदार, नेत्रचिकित्सक ओंकार पोटे यांनी ८०हून अधिक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. त्यांना परिचारिका दिव्या डाकी, सहाय्यक सुनील रसाळ यांनी सहकार्य केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. नंदकुमार इंगळे उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. सोनम गुप्ता, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत घरत, प्रा. सागर मोहिते, समाधान पाटील, संतोष तुरुकमाने, स्नेहल देशमुख, अमोल सोनावणे, विकास घारे, वैभव बोराडे, धनंजय कोटांगळे, ग्रंथपाल जागृती घारे, आरती आवटे, दीपक जोशी यांच्यासह सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.





## कर्जतमधील तिघर येथे आरोग्य तपासणी शिबिर

### मुंबईच्या युनिटी वेल्फेअर क्लबचा उपक्रम

**कर्जत : बातमीदार**

युनिटी वेल्फेअर क्लब-मुंबई या सेवाभावी संस्थेतर्फे कर्जत तालुक्यातील तिघर येथील प्राथमिक शाळेत आदिवासी ग्रामस्थांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. तिघर, तिघर कातकरीवाडी, नांगुर्ले, नांगुर्ले कातकरीवाडी येथील सर्व आदिवासी ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.

युनिटी वेल्फेअर क्लबच्या सदस्यांनी या वेळी शिबिरार्थींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. तसेच आरोग्याची काळजी कशी घ्यायला पाहिजे याविषयी व्हिडिओद्वारे सखोल माहिती देण्यात आली.

संस्थेतर्फे ग्रामस्थांना आरोग्य किट देण्यात आले. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कोमल म्हात्रे, सदस्य शालू मुकणे, हिरा खुटारे, नरेश देशमुख, वसंत रवणे, राजेंद्र पवार, आशा देशमुख, वर्षा पवार, मंगल जाधव, शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर इंगळे, विषय शिक्षिका सविता खडे, उपशिक्षिका योगिता अहिरराव, उपशिक्षक जनार्दन पजई यांच्यासह क्लबचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

## मुठवलीत रंगला शक्ती-तुरा नाचांचा सामना

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मुठवली गावात धाडवे परिवारातर्फे शक्ती-तुरा नाचांचा जंगी सामना आयोजित करण्यात आला होता. या वेळी शक्तीवाले शाहीर चंद्रकांत कदम (रा. कुमशेत, ता. माणगाव) तसेच तुरेवाले शाहीर काशीराम वाढवळ (रा. कालवण, ता. माणगाव) यांचा नाचांचा जंगी सामना झाला. शिवराम वाढवळ, अशोक जाधव, गणपत सत्वे, अनंत वाढवळ, गंगाराम मोरे, वामन पवार, गणेश पाराप्ते, दिलीप नवगणे, महेश वाढवळ, संजय वाढवळ आदींसह मुठवली, कालवण पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला.



(छाया : सलीम शेख)

## भिमाशंकर अभयारण्यात आता स्वच्छता कर

### ▮ वन विभागाचा निर्णय; फेरविचार करण्याची ट्रेकर्स, शिवभक्तांची मागणी

**कर्जत : बातमीदार**

१२ ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या भिमाशंकर येथील मंदिरात श्रावण महिन्यात लाखो भाविक जात असतात. मुंबईकडील भागातील शिवभक्त आणि ट्रेकर्स हे भिमाशंकर अभयारण्यातून चालत जातात, मात्र त्यांच्याकडून वन विभाग स्वच्छता कर वसूल करीत आहे. वन विभागाच्या या कृतीने शिवभक्त आणि ट्रेकर्समध्ये नाराजी पसरली आहे.

श्रावण महिन्यात भिमाशंकर महाराजांच्या शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. श्रावणी सोमवारी तर लाखोंच्या संख्येने शिवभक्त भिमाशंकर येथे पोहचतात. कर्जत तालुक्यातून भिमाशंकरला जाण्यासाठी अभयारण्यातून पायवाट जाते. शेकडो भाविक आणि ट्रेकर्स कर्जत तालुक्यातील खांडस आणि काठेवाडी येथील दोन पायवाटांनी भिमाशंकरला जातात. या मार्गाने अडीच तासात भिमाशंकरला पोहचता येते, मात्र या मार्गातील भिमाशंकर अभयारण्यातून गेल्यानंतर स्वच्छता कर वसूल करण्याचा निर्णय वन विभागाने घेतला आहे. त्याच फटका रायगड तसेच मुंबई, ठाणे येथील ट्रेकर्स आणि शिवभक्तांना बसत आहे. स्वच्छता कराच्या रुपात ६० रुपयांचा भूर्दंड बसत असल्याने शिवभक्तांत नाराजी पसरली आहे.



(छाया : संतोष पेरणे)

> **श्रावण महिन्यात हजारो शिवभक्त आमच्या ग्रामपंचायत हद्दीतील अभयारण्यातून भिमाशंकरला जात असतात. या भागातून जाताना कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी आम्ही घेतो असतो. असे असतानाही वन विभाग भिमाशंकर येथे ६० रुपये स्वच्छता कर आकारात आहे, हे चुकीचे आहे.**
> **-मंगल ऐनकर, सरपंच, खांडस ग्रामपंचायत**

> **आम्ही भिमाशंकर अभयारण्यामध्ये निसर्गाचा आनंद घेत नेहमी जातो, मात्र यावर्षी भिमाशंकर तलाव येथे वन विभाग पर्यटक, ट्रेकर्स आणि शिवभक्त यांच्याकडून स्वच्छता कर वसूल करीत होता. आम्ही स्थानिक आहोत, असे अनेक शिवभक्त सांगत होते. तरीही वन विभाग ऐकत नव्हते.**
> **-डॉ. दिनेश चौरासिया, ट्रेकर**

> **कर्जत तालुक्यातील शेकडो शिवभक्त दर सोमवारी चालत भिमाशंकरला जातात. आमच्यासारख्या जंगलाचे रक्षण करणाऱ्या स्थानिक भाविकांकडून वन विभागाने स्वच्छता कर वसूल करणे अन्यायकारक आहे. त्याचा वन विभागाने फेरविचार करायला हवा.**
> **-कैलाश महाराज भोईर, स्थानिक शिवभक्त, कर्जत**

## पेणमध्ये बेल महोत्सव

**पेण : प्रतिनिधी**

श्रावणी सोमवारनिमित्त पेणमधील प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमध्ये सोमवारी (दि. १) बेल (बिल्व) महोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी उपप्राचार्य कोळी मॅडम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बेलाची रोपे भेट देण्यात आली. प्रत्येकाने बेलाच्या झाडांचे संवर्धन करावे, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

बेल ही भारतीय वनस्पती आहे. वातावरणातील, हवामानातील शुद्धीकरणाचे कार्य बेल वनस्पती करीत असते. बेलाच्या फळांचा सुगंध हा चंदनासारखा असतो. पडसे, खोकला, दमा, ताप, कफ,पोट दुखी, रक्तशय, जखम, सूज अतिसार अशा आजारांवर तसेच गर्भवती महिलांसाठी बेळ फळांचा उपयोग केला जातो. बेल आणि शिव यांचा प्राचीन काळापासून संबंध आहे. श्रावण महिन्यामध्ये महादेवाला बेलपत्री अर्पण केली जाते, त्याचे औचित्य साधून गेल्या वर्षापासून पेण शहरांमध्ये पहिल्या श्रावणी सोमवारी बेल महोत्सव साजरा करण्यात येत आहे. सोमवारी प्रायव्हेट हायस्कूल ज्युनिअर कॉलेजमध्ये आयोजित केलेल्या बेल महोत्सवात के. के मॅडम, निलेश धोत्रे, एस. एम. वळवी, उदय मानकवळे यांच्यासह विद्यार्थी सहभागी झाले होते.



(छाया : अनिस मनियार)

# मनसे पदाधिकाऱ्यांचा शिंदे गटात प्रवेश

## मुख्यमंत्र्यांनी केले स्वागत




**नवी मुंबई, पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यामधील अभूतपूर्व सत्तानाट्यानंतर शिवसेनेमधील अनेक नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटामध्ये प्रवेश केला आहे. रायगड जिल्ह्याच्या पनवेल, उरण तालुक्यातील मनसेच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी सोमवारी (दि. १) सायंकाळी मलबार हिल येथील नंदनवन बंगल्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये शिंदे गटात प्रवेश केला. यामध्ये प्रामुख्याने मनसेचे माजी जिल्हाध्यक्ष अतुल भगत यांचा समावेश आहे.

मागील आठ वर्षांपासून मनसे रायगड जिल्हाध्यक्ष पदावर असणाऱ्या अतुल भगत यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसहीत एकनाथ शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. भगत यांच्यासोबतच मनसेच्या आजी-माजी ६५हून अधिक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटामध्ये प्रवेश केला. भगत यांच्यासोबत नवी मुंबईचे उपतालुकाध्यक्ष आणि इतर पदाधिकारीही शिंदे गटामध्ये सहभागी झाले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन या सर्वांनी शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री शिंदेंनी भगत यांच्या हातात भगवा झेंडा देत त्यांचे आपल्या गटात स्वागत केले. तर या सर्व पदाधिकाऱ्यांनी गणपतीची मूर्ती मुख्यमंत्री शिंदे यांना भेट दिली.

राज्यात सत्तांतर घडवून आणणाऱ्या उठावाचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यात शिवसेनेला धक्के बसू लागले आहेत. ठाणे महापालिकेतील शिवसेनेच्या ६७ पैकी ६६, तर नवी मुंबई पालिकेतील शिवसेनेच्या ३८ पैकी २८ माजी नगरसेवकांनी महिन्याभरापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची नंदनवन येथील निवासस्थानी भेट घेत शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केलेला. त्याचप्रमाणे याआधी पनवेलमधील शिवसेनेच्या अनेक नेत्यांनी शिंदे गटात प्रवेश केला होता.

# धान्य वितरणातील पारदर्शकतेसाठी आता आधार सक्षम प्रणाली कार्यान्वित

**खारघर : प्रतिनिधी**

धान्य वितरण प्रणालीत पारदर्शकता यावी यासाठी आधार सक्षम सार्वजनिक वितरण प्रणाली 'AePDS' (Adhar Enabled Public Distribution System) सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागातर्फे ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे.

काही रास्त भाव धान्य दुकानदारांमार्फत लाभार्थ्यांना व्यवस्थित तसेच ठरल्याप्रमाणे धान्य वितरित केले जात नसल्याच्या तक्रारी पुरवठा विभागाकडे येत असतात. या तंत्रज्ञानामुळे धान्य चोरीच्या घटनांवर आळा बसेल अशी अपेक्षा आहे.

सार्वजनिक धान्य वितरण प्रणालीत पारदर्शकता यावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने आधार सक्षम सार्वजनिक वितरण प्रणाली 'AePDS' विकसित केली आहे.

या नव्या पद्धतीमुळे दुकानात असलेला धान्याचा साठा, वितरण, ठिकाण, शिल्लक साठा याबाबत माहिती तालुक्यातील प्रत्येक दुकानदाराबद्दल मिळणार आहे. अन्न सुरक्षा राष्ट्रीय योजनेतील लाभार्थ्यांसाठी सध्या केवळ गहू आणि तांदूळ ही दोनच धान्य मिळत असल्याने या प्रणालीतील पावतीवर केवळ या दोन धान्यांविषयीच माहिती मिळते. www.mahaepos.gov.in या संकेतस्थळावर वर्षभरात किती धान्य वितरित केले. ही माहिती प्रत्येक जिल्ह्याची आकडेवारीनुसार मिळते.

या प्रणालीद्वारे दुकानदारांमार्फत धान्य देण्यास टाळाटाळ केली अथवा धान्य वितरणात तफावत आढळल्यास तालुका पुरवठा अधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार करता येणार आहे.

**दोन वर्षांपासून ही प्रणाली जिल्ह्यात कार्यान्वित आहे. गरजूंना शासनाच्या अन्न योजनेचा लाभ मिळावा उद्देशाने शासनाच्या अन्न नागरी विभागातर्फे आधार सक्षम सार्वजनिक वितरण प्रणाली सुरू करण्यात आली आहे. सक्षणपणे ही प्रणाली जिल्ह्यात सुरू आहे. तांत्रिक अडचणीमुळे लाभार्थ्याला धान्य मिळत नसेल, तर ऑफलाइन पद्धतीने धान्य वितरणाच्या सूचना दुकानदारांना आम्ही देत असतो.**

**-मधुकर बोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी**

# नेरूळमध्ये अपघात विमा योजना शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप कार्यकर्ते गणेश भगत आणि स्थानिक माजी नगरसेविका रूपाली भगत यांच्या वतीने २९ व ३१ जुलैदरम्यान भारतीय डाक विभागाची अपघात विमा योजना शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात एकूण २०१ नागरिकांनी आपली अपघाती विमा योजना सुरू केली.

तीन दिवसीय शिबिर यशस्वी करण्यासाठी भारतीय डाक विभागाचे कर्मचारी वर्ग, विमल गांडाळ, छाया चव्हाण, सुनीता निमसे, सामाजिक कार्यकर्ते मंगेश राऊत, दिलीप राऊत, विनोद चाळके, सुनील गलांडे, पांडुरंग बेलापूरकर, लक्ष्मण कणसे, रमेश नार्वेकर, वासुदेव पाटील, सहादू सुकाळे, जालिंदर यादव, सुनील वायकर, राजु तुरे, रमेश बोऱ्हाटे, विजय पातेरे, सागर मोहिते, विकास तिकोणे, सूर्या पात्रा, मंगेश काटकर, शशिकांत जगताप, अशोक गांडाळ, संतोष शिंदे, राजेश घाडी, मयुर पवार यांनी विशेष सहकार्य केले.

# आयसीएल महाविद्यालयाविरोधात 'अभाविप'चे स्वाक्षरी अभियान

## शेकडो विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशीमधील आयसीएल महाविद्यालयात सुरू असलेल्या गैरकारभाराच्या विरोधात व विद्यार्थ्यांच्या समस्यांसंदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या (अभाविप) वतीने स्वाक्षरी अभियान राबविले. महाविद्यालय प्रशासनास कित्येक वेळा पत्रव्यवहार, निवेदन, विनंती करून देखील महाविद्यालय प्रशासन वारंवार विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे, समस्यांकडे डोळेझाक करत आहे.

विद्यापीठाचे १३ जूनपासून महाविद्यालय सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाही तब्बल एक महिना उशिरा महाविद्यालय सुरू झाल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले आहे. जिमखाना फीच्या नावाने दरवर्षी सरसकट ४०० रुपये आकारत असतानाही मूलभूत सुविधांचा अभाव पाहायला मिळत आहे. ८०० विद्यार्थ्यांना नाममात्र ४० संगणकावरून शिक्षण दिले जात आहे.

विद्यापीठ विकास निधी आणि डेव्हलपमेंट फंड या वेगवेगळ्या नावाने विद्यार्थ्यांकडून दरवर्षी ११०० रुपयांची आकारणी केली जाते. एनसीसी युनिटसाठी विद्यार्थी सातत्याने मागणी करत असतानाही मॅनेजमेंटचा या मागणीकडे कानाडोळा केला जात आहे. महाविद्यालयात अनुदानित प्राध्यापकांच्या २० जागा अजूनही त्या अद्याप रिक्त आहेत. विद्यापीठ परिपत्रकानुसार गरजू विद्यार्थ्यांना इंस्टॉलमेंटची सुविधा बंधनकारक असतानाही ती महाविद्यालयात उपलब्ध केली जात नाही. गेल्या सहा ते सात वर्षांपासून उपहारगृह सुविधा दिली जात नाही. महाविद्यालयाच्या गलथान कारभारामुळे गेल्या सहा ते सात वर्षांपासून रिनोवेशनचे काम सुद्धा अपूर्णावस्थेत आहे. विद्यार्थ्यांना सामना कराव्या लागणाऱ्या अशा कित्येक समस्या व आय.सी.एल महाविद्यालय प्रशासनाकडून होत असलेल्या गैरकारभाराविरोधात सोमवारी (दि. १) अखिल भारतीय विद्यार्थी परिषद नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने महाविद्यालयाबाहेर स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी राबविण्यात आलेल्या या स्वाक्षरी अभियानास महाविद्यालयातील हजारो विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत महाविद्यालयाकडून होत असलेल्या गैरकारभाराविरोधात स्वाक्षरी करत रोष व्यक्त केला.

अभाविप कोंकण प्रदेश मंत्री अमित ढोमसे म्हणाले, विद्यार्थ्यांचे आर्थिक शोषण करण्याचा प्रयत्न महाविद्यालय प्रशासनाकडून कित्येक वेळा होत आहे, तसेच महाविद्यालय व्यवस्थापनाकडून चाललेल्या अन्यायाविरोधात आवाज उठविणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न महाविद्यालय प्रशासनाकडून वारंवार होत आहे. अभाविप आयसीएल महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसोबत खंबीरपणे उभी आहे. आयसीएल महाविद्यालय प्रशासनाने यापुढेदेखील जर विद्यार्थी विरोधी भूमिका कायम ठेवली, तर अभाविप विद्यार्थ्यांच्या हितासाठी महाविद्यालय प्रशासनाच्या विरोधात आणखी तीव्र आंदोलन करेल.

**आयसीएल महाविद्यालय प्रशासन हे वारंवार विद्यार्थी विरोधी भूमिका घेत आहे. महाविद्यालयाची फी भरल्यानंतर विद्यार्थ्यांना दिल्या पाहिजेत, अशा मूलभूत सुविधा सुद्धा महाविद्यालयात उपलब्ध नाहीत.**

**-शुभम शिंदे, महाविद्यालय प्रमुख, अभाविप, नवी मुंबई जिल्हा**

# फुंडे हायस्कूलमध्ये लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठेंना अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. १) लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्या वर्तक, स्कूल कमिटी सदस्य आणि फुंडे ग्रामपंचायतीचे सरपंच सागर घरत, स्कुल कमिटी सदस्य आणि डोंगरी ग्रामपंचायत उपसरपंच दर्शन घरत, पर्यवेक्षक गोडगे सर, एस. जी. म्हात्रे, नववीच्या वर्गशिक्षिका एस. एस. पाटील या सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमपूजन संपन्न झाले.

यानंतर विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी भाषणे झाली. यामध्ये अश्विनी करांडे, प्राची घरत, स्नेहल थोरात, मोहिनी काळेबाग, पंखुडी मौर्य या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची माहिती सांगितली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल शिंदे हिने केले तर कार्यक्रमाची तयारी नववी 'अ'च्या वर्गाने केली होती. या वेळी सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# पोलीस पाटील कुणाल लोंढे सन्मानित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी रायगड डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी कर्मचारी यांचा गौरव सोहळा झाला. या वेळी पनवेल तालुक्यामधून कुणाल लोंढे यांना उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या वेळी अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, स्नेहा उबाळे, जिल्हा नियोजन अधिकारी जयसिंग मेहेत्रे, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, पनवेल प्रांताधिकारी राहुल मुडंके, तहसीलदार विजय तळेकर तसेच जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार व इतर महसूल अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात नागशिल्पांचे प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये नागपंचमी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून तयार केलेल्या नागशिल्पांचे प्रदर्शन या वेळी भरविण्यात आले.

अनेक विद्यार्थ्यांनी नागाच्या विविध प्रतिकृती तयार करून त्यांचे प्रदर्शन भरविले. प्राचार्या साधना डोईफोडे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख आणि रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, सांस्कृतिक विभागाच्या सहायक श्रीमती हर्षला पाटील, द्रोपदी वर्तक, चारूशीला ठाकूर आणि प्रसन्न ठाकूर तसेच इयत्ता नववी 'ब'चे विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयातील इयत्ता नववी 'ब'च्या वर्गातर्फे नागपंचमीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित नाग शिल्प प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपापल्या परीने आपल्या सृजनशीलतेला वाव देऊन आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर अनेक नाग शिल्प बनवून आणले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष साधना डोईफोडे होत्या. त्यांनी प्रतिकात्मक नावे शिल्पाचे पूजन केले. विद्यालयातील शिपाई रयत सेवक डी. आर. ठाकूर आप्पा यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. विद्यार्थी प्रतिनिधी दीक्षा रमेश वर्तक हिने उपस्थितांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. सापांच्या बाबतीतील अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांना त्यांनी आपल्या मनोगत आतून समजावून सांगितले.



दरम्यान, दीपप्रदर्शन आणि नाग शिल्प प्रदर्शन यांच्यातील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्प ज्ञानात भर टाकणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाच्या सहायक हर्षला पाटील यांनी केले.

# मैत्री दिनानिमित्त बाजारात विविध प्रकारचे फ्रेंडशिप बँड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




भारतामध्ये ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी मैत्री दिन साजरा केला जातो. या दिवशी मित्र-मैत्रिणी शुभेच्छा देण्यासाठी विविध प्रकारचे फ्रेंडशिप बँड बाजारात आले आहेत.

देशातील तरुणाई वर्षभर ज्या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असते, तो फ्रेंडशिप डे रविवारी ७ ऑगस्ट रोजी साजरा होणार आहे. मैत्रीचे नाते हे प्रत्येक व्यक्तीसाठी खास असते, पण आता टेक्नॉलॉजीच्या या युगात फ्रेंडशिप डेच्या निमित्ताने बाजारात अनेक क्लासिक आणि युनिक बँड आले आहेत. अगदी दहा रुपयांपासून ते १०० पर्यंत विविध प्रकारच्या अंगठ्या, बँड्स आले आहेत. खरंतर फ्रेंडशिप ही सेलिब्रेशन बँडच्या रूपात पाहायला मिळते. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये हा मैत्रीचा दिवस साजरा करण्यासाठी मित्र-मैत्रिणींना फ्रेंडशिप बँड भेट देण्यात येतात.

मैत्री दिनानिमित्त अनेक जुने मित्र एकमेकांना भेटतात व जुन्या आठवणी जाग्या करतात. आयुष्यात प्रत्येकाच्या वेगवेगळ्या ठिकाणी मैत्री होतच असते. अगदी लहानपणापासूनचे मित्र कायम आपल्यासोबत असतात, परंतु नोकरीनिमित्त प्रत्येक जण वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असतो. म्हणून इतर दिवसांप्रमाणे फ्रेंडशिप डेला तरुणाई महत्त्व देऊ लागली आहे.

# फकिरा पॅन्थर संस्थेतर्फे अण्णाभाऊ साठेंना मानवंदना

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशानुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जयंती सोहळा साजरा करणे अनिवार्य आहे. यासाठी फकिरा पँथर सामाजिक संघटनेच्या माध्यमातून १ ऑगस्ट रोजी नवी मुंबईतील शासकीय व निमशासकीय कार्यालयात भेट देऊन जयंती उत्सव महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार साजरा करण्याचा उपक्रम राबविण्यात आला होता.



या उपक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय, पाणी पुरवठा विभाग, स्वच्छता विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत विभागात फकिरा पँथरच्या पुढाकाराने साहित्य रत्न अण्णाभाऊना साठेंना मानवंदना अर्पण करण्यात आली.

उपक्रम आक्रमक व विधायक पद्धतीने पूर्ण करण्याकरिता फकिरा पँथरचे संस्थापक अध्यक्ष ॲड. गुरू सुर्यवंशी यांच्या नेतृत्वात प्रमोद आवाड, शेषेराव कुचेकर, शंकर चांदणे, रवी सुर्यवंशी, नवनाथ मुंडे, देवानंद कांबळे, किसन वाणी, दुर्योधन पारवे व प्रशासन अधिकारी वर्गाचे विशेष सहकार्य प्राप्त झाले.

# राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती उर्जा कंपनी सरकारी मालकीची नाही?**
*अ.* एनटीपीसी *आ.* पॉवर ग्रीड *इ.* गेल *ई.* टाटा पॉवर

**२. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**
*अ.* गृह कर्ज *आ.* कारवरील कर्ज
*इ.* क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज *ई.* इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**३. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**
*अ.* नटराजन चंद्रशेखरन *आ.* राकेश झुनझुनवाला *इ.* रमेश दमाणी *ई.* नंदन निलकेणी






**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# घोणसे घाटात पुन्हा अपघात

## दैव बलवत्तर म्हणून बल्कर वाचला

(छाया : संजय खांबेटे)



**म्हसळा : प्रतिनिधी**

माणगाव-दिघी या रस्त्यावरील घोणसे घाटातील केळेवाडी येथील एका तीव्र वळणावर मंगळवारी (दि. २) भरधाव वेगाने चाललेल्या बल्करचा भिषण अपघात झाला. या अपघातात बल्कर पलटी झाल्यामुळे वाचला; अन्यथा तो दरीत कोसळला असता आणि वित्त आणि मनुष्यहानी झाली असती.

**घोणसे घाटातील केळेवाडी येथील शेवटचे तीव्र वळण ते पुढील ५०० मीटर क्षेत्र धोकादायक आणि अपघात प्रवण क्षेत्र आहे, वळणावरील थोड्या भागात संरक्षक भिंत बांधली आहे, आजचा अपघात संरक्षक भिंत संपते तेथेच झाला. त्याच्या पुढे २० मीटर क्षेत्रात संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे.**
**-अनिल महामुनकर,**
**सामाजिक कार्यकर्ते, देवघर-घोणसे**

सीमेंट बल्कर (एमएच-४६,पी-१२३) जेएसडब्ल्यू वडखळ येथून देवघर (ता. म्हसळा) येथील प्लँटवर जात होता. माणगाव-दिघी या रस्त्यावरील घोणसे घाटातील केळेवाडी येथील शेवटच्या तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटून बल्कर पलटी झाला.

अपघाताचे वृत्त कळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, तलाठी सुनिल भगत, अमोल शिगवण, देवघर आणि घोणसे ग्रामपंचायत कर्मचारी प्रदीप महामुनकर, अक्षय खेडेकर, केळेवाडी ग्रामस्थ उमेश गणवे यांनी घटनास्थळी धाव घेत विशेष मदत केली. या अपघाताची नोंद म्हसळा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

(छाया : विजय मांडे)



# नेरळ-कळंब रस्त्याचे काम अर्धवट

## एसटी बससेवेसाठी लागणार काही काळ

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ-कळंब राज्यमार्गावरील १५० मीटर रस्त्याचे काम अर्धवट असल्याने या मार्गावरील एसटी गाड्यांच्या फेऱ्या बंद आहेत. त्याचा फटका ५०हून अधिक गावे आणि आदिवासी पाड्यांमधील विद्यार्थ्यांना तसेच नोकरदारांना बसत आहे. या रस्त्याची प्रशिक्षण बस आणून चाचणी घेतली मात्र रस्ता दोन ठिकाणी दुरुस्त केल्यास लगेचच या मार्गावर एसटी सुरू करण्यात येईल, असे एसटी महामंडळाच्या कर्जत आगारातर्फे सांगण्यात आले.

नेरळ-कळंब रस्त्याचे काम अर्धवट असल्याने कर्जत एसटी आगाराने या मार्गावरील गाड्या बंद ठेवल्या आहेत. नेरळ स्थानकातून कशेळे, शिंगढोळ, नेरळ-गुडवण तसेच कर्जत याशिवाय नेरळ-कळंब रस्त्यावरून धावणाऱ्या नेरळ-वारे, नेरळ-कळंब, नेरळ-बोरगाव, नेरळ-ओलमण, नेरळ-मुरबाड तसेच कळंब-वांगणी, नेरळ-देवपाडा आणि नेरळ-पोशीर या एसटी गाड्या चालविल्या जातात. कर्मचाऱ्यांचा संप मिटल्यावर कर्जत आगाराने नेरळ एसटी स्थानकातून गाड्या सुरु केल्या. मात्र नेरळ-कळंब रस्त्यावर नेरळ, धामोते येथे रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम सुरु आहे, त्या ठिकाणी रस्त्याच्या एका लेनचे बांधकाम अपूर्ण आहे. त्यामुळे एसटी गाड्यांच्या फेऱ्या अजूनही बंद ठेवण्यात आल्या आहेत. त्याचा फटका प्रामुख्याने जून महिन्यापासून स्थानिक विद्यार्थ्यांना बसत आहे.

दरम्यान, कर्जत एसटी आगाराचे व्यवस्थापक शंकर यादव यांनी पेण विभागीय कार्यालयाकडून आलेल्या प्रशिक्षण बसने नेरळ एसटी स्टँड तसेच नेरळ ते दहिवली पुलाची पाहणी केली. त्यांच्या बरोबर सहाय्यक वाहतूक निरीक्षक ज्योतिराम ठोंबरे, महादेव पालवे, देवानंद मोरे, चालक निलेश लांडगे व निलेश भायदे होते.

या पाहणीत सुर्या गॅलक्सी या इमारतीसमोर एका ठिकाणी रस्ता खचला आहे तसेच थोडे पुढे एक छोटी मोरी आहे, तेथील रस्ता खूप अरुंद आहे. तेथून एसटी बस जेमतेम जाते. तेथे एसटी बस कधीही खाली जाईल व अपघात होऊन प्रवाशांना दुखापत होण्याची शक्यता आहे. तेथील रस्ता दुरुस्त केल्यानंतर एसटी प्रवाशांना सुरक्षितपणे घेऊन जाऊ शकेल, असे अधिकाऱ्यांनी बोलून दाखविले. याबाबतचा अहवाल विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात येईल आणि त्या कार्यालयाने हिरवा कंदिल दिल्यानंतर या मार्गावर एसटी बस सुरू होईल असे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**आम्ही या मार्गावरून एसटी बस फिरवून पाहणी केली, मात्र प्रवाशांची सुरक्षितता महत्त्वाची असल्याने कोणताही धोका पत्करून एसटी बस सुरु करणे योग्य नाही. दोन ठिकाणी अरुंद रस्ता आहे. तो दुरुस्त केल्यावर त्याचा अहवाल विभागीय कार्यालयाकडे जाईल. तेथून आदेश आल्यानंतर या रस्त्यावरून लगेचच एसटीच्या फेऱ्या सुरू करण्यात येतील.**
**-शंकर यादव,**
**आगार व्यवस्थापक, कर्जत**

# चोळईत धान्य कुजल्याने कशेडी घाटाच्या प्रारंभी पसरली प्रचंड दुर्गंधी



(छाया : शैलेश पालकर)

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटामध्ये चोळई गावाच्या हद्दीत ट्रक कोसळल्यानंतर सांडलेल्या तूस आणि धान्यावर पावसाचे पाणी पडल्याने प्रचंड प्रमाणात दुर्गंधी पसरत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या दुर्गंधीमुळे अनेक वाहनचालकांना ओकारीसाठी उबळ येत असल्याचे दिसून आले आहे.

पोलादपूर शहरापासून केवळ दीड किमी अंतरावरील कशेडी घाटातील चोळई गावात यंदा अपघाताचे प्रमाण वाढले आहे. वारंवार डोंगरातून लालमातीचे ढिगारे व दरडी कोसळू लागल्या आहेत. गेल्या महिन्यामध्ये चोळई येथील घाट रस्त्याच्या उतारावर भाताचा तूस वाहून नेणारा ट्रक कोसळला होता. या तूसासह कुजलेल्या तांदूळामुळे गेल्या काही दिवसांपासून कशेडी घाट उतरताना तसेच घाटात प्रवेश करताना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी निर्माण झाली आहे. वाहनचालकांना या घाणेरड्या वासामुळे ओकारीची उबळ येत असून स्थानिक ग्रामस्थदेखील दुर्गंधीमुळे हैराण झाले आहेत. सध्या उन-पावसाचा खेळ सुरू असल्याने सुकलेल्या तूस आणि तांदूळांवर पुन्हा पाऊस पडल्यानंतर दुर्गंधी सुटत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# जिल्ह्यात बर्ड फ्लूचा प्रादूर्भाव नाही

## अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील खाजगी कुक्कुट व्यावसायिक पक्षीगृह व सधन कुक्कुट विकास गट, पेण येथील पक्षी मृत झाले असल्यामुळे पुणे येथील विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळे मार्फत भोपाळ येथील एवियन इन्फ्लूएन्झा प्रयोगशाळेत २७ व २८ जुलै रोजी नमुने पाठविण्यात आले होते. या नमुन्यांचा निकाल नकारात्मक आला असून, पेण तालुक्यातील व जिल्ह्यातील कुक्कुट व्यावसायिकांनी घाबरून जाण्याची गरज नाही. जिल्ह्यात तसेच पेण तालुक्यात बर्ड फ्लू रोगाचा प्रादूर्भाव झालेला नाही, अशी माहिती जिल्हा पशूसंवर्धन विभागाने कळविली आहे.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कशेळे येथे गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार

(छाया : संतोष पेरणे)





**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका आदिवासी ठाकूर समाज संघटनेकडून कशेळे येथील भवानी माता मंदिर सभागृहात नुकताच आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

दहावीच्या परीक्षेत कर्जत तालुक्यात आदिवासी समाजात प्रथम आलेली अमृता राजू झुगरे हिच्यासह एकूण १५६विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, दप्तर, रोख रक्कम, सन्मान चिन्ह देऊन या वेळी गौरवण्यात आले. १००टक्के निकाल लागलेल्या कर्जत तालुक्यातील आश्रम शाळा तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकिय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अनुसया पादीर, जयवंती हिंदोळा, शिक्षक केशव कवटे, शरद ठोंबरे आदींना या वेळी सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य ठाकूर-ठाकर संघटनेचे उपाध्यक्ष दादा पादीर, काशिनाथ पादीर, जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडा, कर्जत तालुका अध्यक्ष भरत शिद, उपाध्यक्ष मंगळ केवारी, मुरबाड तालुका अध्यक्ष रघुनाथ खाकर, एकात्मिक आदिवासी पेण प्रकल्प अधिकारी शेरमकर, प्रकल्प नियोजन समितीचे माजी दत्तात्रेय सुपे, मुरबाड पं.स.च्या माजी उपसभापती अरुणा खाकर, ठाणे जि.प.चे माजी सदस्य गोविंद भला, रायगड जि.प.च्या माजी सदस्या रेखा दिसले, कर्जत पं. स. च्या माजी सदस्या सुरेखा हरपुडे,तसेच चाहू सराई, सुहास वारे, बाळकृष्ण पादीर, रेवती ढोले यांच्यासह विद्यार्थी व आदिवासी बांधव या वेळी उपस्थित होते.

# सिटीझन फोरम ट्रस्टचे मोतीबिंदूमुक्त रोहा अभियान!

## दोन महिन्यांत १६१ जणांना मिळाली नवी दृष्टी



(छाया : जितेंद्र जाधव)

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा सिटीझन फोरम ट्रस्ट आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १) घेतलेल्या नेत्र तपासणी शिबिरात १८२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी मोतिबिंदू आढळलेल्या ४५रुग्णांना नवीन पनवेलमधील आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. मोतीबिंदू मुक्त रोहा अभियानाअंतर्गत गेल्या दोन महिन्यांत ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल १६१रुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे.

रोह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात सोमवारी घेण्यात आलेल्या शिबिरात आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे मॅनेजर सचिन भुमकर, टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ. निकिता म्हापूसकर, प्रिया अग्निहोत्री, नंदिनी देवधरकर, तान्या कटियार, नरेश आवलर, कल्पेश सावंत आदींनी रुग्णांची नेत्र तपासणी केली. या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप करण्यात आले. मोतीबिंदू आढळलेल्या ४५रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले.

रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, प्रदिप देशमुख, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, मिलिंद अष्टीवकर, महेश सरदार, इल्यास डबीर, सचिन शेडगे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, राजेश काफरे, शैलेश रावकर, दिनेश जाधव, दिनेश मोहिते, समिधा अष्टीवकर, भावेश अग्रवाल, शंतनू अष्टीवकर यांच्यासह ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

# चेंढरे ग्रामपंचायत सभागृहात संवेदीकरण कार्यशाळा



**अलिबाग : जिमाका**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग आणि जिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने चेंढरे ग्रुप ग्रामपंचायत सभागृहात नुकताच एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका व अंगणवाडी सेविका यांना एचआयव्ही एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी संवेदीकरण कार्यशाळा घेण्यात आली.

रायगड जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने, जिल्हा सहाय्यक लेखा रवींद्र कदम, आयसीडीएस प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील, रुपेश पाटील, पर्यवेक्षिका भाग्यश्री पाटील, दीप्ती मोकल, उल्का कुलकर्णी, कल्पिता साळावकर, विनोदिनी मोकल, गीताई कटोर तसेच अलिबाग तालुक्यातील अंगणवाडी सेविका प्रशिक्षणासाठी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक संजय माने यांनी एड्स विषयी माहिती दिली. एड्सची कारणे, लक्षणे तसेच प्रतिबंधात्मक उपाय, सामाजिक स्थान व आपले कर्तव्य काय आहे, एड्स वर नियंत्रण कसे करता येईल, याविषयी सखोल माहिती या कार्यशाळेच्या माध्यमातून देण्यात आली. समाजात आजही एड्स विषयी जनजागृतीची आवश्यकता का आहे तसेच त्यात आपली भूमिका काय असली पाहिजे हे अंगणवाडी सेविकांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमाचा मूळ उद्देश एड्स विषयी जनजागृती करणे हा असून संपूर्ण रायगड जिल्ह्यात हा कार्यक्रम राबविण्यात येत असल्याचे संजय माने यांनी यावेळी सांगितले. तर आजपर्यंत अनेक अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित केले असल्याचे सांगण्यात आले.

आयसीडीएस प्रकल्प अधिकारी गीतांजली पाटील यांनी महाराष्ट्र शासनामार्फत देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राबविण्यात येणाऱ्या हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान, आरोग्य व स्वच्छता याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका जिविता पाटील यांनी केले तर अंगणवाडी सेविकांतर्फे वैशाली पाटील यांनी प्रातिनिधिक स्वरूपात प्रतिक्रिया दिली. या कार्यक्रमासाठी डॉ. सुभाष माने तसेच ग्रुप ग्रामपंचायत चेंढरेचे सरपंच व कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले. पर्यवेक्षिका भाग्यश्री पाटील यांनी आभार मानले.

# पोलादपूर तालुक्यातील दाभिळच्या पोलीस पाटील विमल मोरे सन्मानित



**पोलादपूर : प्रतिनिधी**

महसूल दिनानिमित्त सोमवारी (दि. १) अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी पोलादपूर तालुक्यातील दाभिळ गावाच्या विमल तुकाराम मोरे यांचा उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून सन्मान केला.

दापोली कृषी विद्यापिठाच्या कर्मचाऱ्यांच्या बसला आंबेनळी घाटात झालेल्या अपघातात तसेच आंबेमाची आणि दाभिळ दरडग्रस्त भागामध्ये दाभिळ गावच्या पोलीस पाटील विमल मोरे यांनी प्रभावीपणे सेवाभावी कर्तव्यनिष्ठा दाखविल्या होत्या.

महसूल दिनानिमित्त सोमवारी महसूल विभागातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हा अधिकारी कार्यालया तर्फे सन्मान करण्यात आला. या वेळी दाभिळच्या पोलीस पाटील विमल मोरे यांना जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात आले.

# कोलाड येथे लो. टिळक, अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात सोमवारी (दि. १) लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची १०२ वी जयंती साजरी करण्यात आली. या वेळी मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

प्रा. सूर्यकांत आमलपुरे यांनी स्वरचित कविता 'साहित्यरत्न अण्णाभाऊ' या कवितेचे वाचन केले आणि प्रा. सतीश सावळे यांनी अण्णा भाऊंच्या जीवन कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयवंती अडलीकर यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, प्रा. प्रणिता सिंग, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. नेहल प्रधान, प्रा. अनिरुद्ध मोरे यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

# राष्ट्रकुलमध्ये भारतीय सायकलपटूचा अपघात

## स्पर्धेदरम्यान अंगावरून गेली सायकल



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंडमधील बर्मिंगहॅम येथे २२व्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोमवारी (दि. १) या स्पर्धेचा चौथा दिवस होता. चार दिवसांत या ठिकाणी दोन अपघात झाले आहेत. दुसऱ्या अपघातामध्ये भारतीय साकलपटूचा समावेश आहे. शर्यत सुरू असताना भारतीय सायकलपटू मीनाक्षीचा अपघात झाला. या अपघातादरम्यान प्रतिस्पर्धी खेळाडूची सायकल तिच्या अंगावरून गेली.


महिलांच्या १० किलो मीटर स्केच रन स्पर्धेदरम्यान मीनाक्षीचा अपघात झाला. या अपघातात मीनाक्षी सायकलवरून घसरून ट्रॅकच्या कडेला पोहचली. त्याचवेळी मागून येणारी न्यूझीलंडची सायकलपटू ब्रायोनी बोथा आपला वेग नियंत्रित करू शकली नाही. तिची सायकल मीनाक्षीच्या अंगावरून गेली. यानंतर बोथाही सायकलवरून खाली पडली.

अपघात होताच डॉक्टरांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दोन्ही सायकलपटूंना शर्यतीतून बाहेर नेले. मीनाक्षीला तेथून स्ट्रेचरवर नेण्यात आले. मीनाक्षीच्या अपघाताचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

हरियाणाची रहिवासी असलेल्या मीनाक्षीने २०१९मध्ये व्यावसायिकपणे सायकल चालवण्यास सुरुवात केली होती. त्या वर्षी झालेल्या राष्ट्रीय सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत तिने चमकदार कामगिरी केली. उत्कृष्ट कामगिरीमुळे मीनाक्षीची २०२०मध्ये भारतीय प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली. यंदा तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर आशियाई ट्रॅक सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आहे.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील सायकल ट्रॅकवर चार दिवसात दोन अपघात झाले आहेत. यापूर्वी इंग्लंडचा सायकलपटू मॅट वॉल्स स्पर्धेदरम्यान खाली पडला होता. या अपघातात एक प्रेक्षकही जखमी झाला आहे. त्याच शर्यतीत भारताचा विश्वजित सिंगही सहभागी झाला होता. सुदैवाने तो अपघातातून बचावला. त्यानंतर आता भारतीय सायकलपटू मीनाक्षीचा अपघात होऊन दुसऱ्या स्पर्धकाची सायकल तिच्या अंगावरून गेली. त्यामुळे चिंता व्यक्त होत आहे.

# जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धा



**अलिबाग : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या निर्देशानुसार सन २०२२-२३ या वर्षात राष्ट्रीय स्तरावरील नेहरू चषक हॉकी स्पर्धेचे आयोजन २ सप्टेंबरपासून नवी दिल्ली येथे होणार आहे. त्यानुसार जिल्हा व विभागस्तरावरील स्पर्धेचे आयोजन १२ ऑगस्टपूर्वी करण्याबाबत क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हास्तरावरील स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रतिवर्षी भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत शालेय व इतर क्रीडा जिल्हास्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.

हॉकी स्पर्धेत भाग घेण्याकरिता १५ वर्षे मुले (सब ज्युनिअर) गटातील स्पर्धकाची जन्मतारीख १ नोव्हेंबर २००७ किंवा त्यानंतरची असावी, तर १७ वर्षे मुले व १७ वर्षे मुली (ज्युनिअर) गटातील स्पर्धकाची जन्मतारीख १ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतरची असावी.

स्पर्धा आयोजनासाठी इच्छुकांनी आपल्या प्रवेशिका ४ ऑगस्ट सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोहोपाडा (ता. खालापूर) येथील प्रिया स्कूलमध्ये क्रीडा शिक्षक श्री. सोनार (९९८७७००१९८४) यांना सादर कराव्यात तसेच स्पर्धेसंदर्भात अधिक माहितीकरिता क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे (९८५०९५४२३७) व क्रीडा शिक्षक श्री. सोनार (९९८७७००१९८४) यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्हास्तरीय हॉकी स्पर्धेत जास्तीत जास्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील संघांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी केले आहे.

# दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताचा पराभव

## विंडीजच्या मॅकॉयची भेदक गोलंदाजी



**सेंट किट्स : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील पाच सामन्यांच्या मालिकेतील दुसरा टी-२० सामना सोमवारी (दि. १) सेंट किट्समधील बॅस्टेअर वॉर्नर पार्क येथे खेळवला गेला. या सामन्यात विंडीजने भारताचा पाच गडी राखून पराभव केला. ओबेड मॅकॉयच्या भेदक गोलंदाजीसमोर भारतीय फलंदाजी निष्प्रभ ठरली.

संपूर्ण भारतीय संघ १९.४ षटकांमध्ये केवळ १३८ धावांवर गुंडाळला गेला. भारताने विजयासाठी दिलेले १३९ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या विंडीजने चार चेंडू शिल्लक असताना विजयावर शिक्कामोर्तब केले. वेस्ट इंडिजकडून ब्रँडन किंगने अर्धशतकी खेळी करून सर्वाधिक ६८ धावा केल्या. त्यामध्ये आठ चौकार आणि दोन षटकारांचा समावेश आहे. त्याशिवाय डेव्हॉन थॉमसने नाबाद १९ आणि कर्णधार निकोलस पूरनने १४ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंग, रवींद्र जडेजा, आर अश्विन, हार्दिक पांड्या आणि आवेश खान यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

डावखुऱ्या मॅकॉयने केवळ १७ धावांत सहा गडी बाद केले. ही त्याच्या टी- २० कारकिर्दीतील सर्वोत्कृष्ट कामगिरी ठरली. शिवाय टी-२० क्रिकेटमधील वेस्ट इंडिजच्या कोणत्याही गोलंदाजाची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. मॅकॉयशिवाय जेसन होल्डरने दोन बळी घेतले.

पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना भारताने ६८ धावांनी जिंकला होता, तर दुसरा सामना विंडीजने जिंकला आहे. त्यामुळे दोन्ही संघ मालिकेत बरोबरीत आले आहेत.

# भारताच्या 'अ' संघाची फ्रान्सशी बरोबरी



**चेन्नई : वृत्तसंस्था**

खुल्या विभागातील दुसऱ्या मानांकित भारताच्या 'अ' संघाला सोमवारी बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत फ्रान्सने २-२ असे बरोबरीत रोखले, तर दोन्ही विभागांतील भारताच्या 'क' संघांना पराभवाचा सामना करावा लागला.

भारताच्या सहाही संघांनी पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये या स्पर्धेवर वर्चस्व गाजवले होते. चौथ्या फेरीत मात्र भारताच्या तीन संघांची विजयाची मालिका खंडित झाली. खुल्या विभागातील भारताच्या 'अ' संघाला फ्रान्सविरुद्ध सर्वोत्तम खेळ करता आला नाही. पहिल्या पटावरील पी. हरिकृष्णाला जुल्स मोसार्ड, विदित गुजराथीला लॉरेंट फ्रेसिनेट, अर्जुन इरिगेसीला मॅथेऊ कॉर्नेट आणि एस. एल. नारायणनला मॅक्सिम लग्रेडने बरोबरीत रोखले.

भारताच्या 'क' संघाने स्पेनकडून १.५-२.५ अशी हार पत्करली. सूर्यशेखर गांगुली, एस. पी. सेतुरामन आणि मुरली कार्तिकेयन यांचे सामने बरोबरीत सुटले. त्यामुळे भारताची अभिजित गुप्तावर भिस्त होती, मात्र तो डेव्हिड अँटोनकडून ४१ चालींमध्ये पराभूत झाल्याने भारताच्या 'क' संघाचाही पराभव झाला.

भारताच्या 'ब' संघाला मात्र विजयी घोडदौड कायम ठेवण्यात यश आले. त्यांच्या डी. गुकेश आणि निहाल सरिन यांनी विजयांची नोंद केली. रौनक साधवानी आणि आर. प्रज्ञानंद यांना मात्र बरोबरीवर समाधान मानावे लागले.

महिला विभागात भारताच्या 'अ' संघाने हंगेरीवर २.५-१.५ अशा फरकाने मात केली. कोनेरू हम्पी आणि द्रोणावल्ली हरिकासह आर. वैशालीचे सामने बरोबरीत सुटले. तानिया सचदेवने अनुभव पणाला लावत ५२ चालींमध्ये सोका गालवर निर्णायक विजय मिळवल्यामुळे भारतीय 'अ' संघाला सलग चौथ्या विजयाची नोंद करता आली. 'ब' संघाने इस्टोनियाला २.५-१.५ असे पराभूत केले. 'क' संघाने मात्र निराशाजनक कामगिरी करताना जॉर्जियाकडून १-३ असा पराभव पत्करला. या संघाच्या इशा करवडे, साहिथी वर्षिनी आणि प्रत्युशा बोड्डा पराभूत झाल्या. केवळ पी. व्ही. नंधिधाला विजय मिळवण्यात यश आले.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त अलिबाग ते सहाणगोठी मिनी मॅरेथॉन

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा अर्थात हर घर तिरंगा अभियान देशभरात राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत रायगड जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र, प्रिझम सामाजिक विकास संस्था अलिबाग आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते ९ वाजता अलिबाग येथे मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा मार्ग अलिबाग रायगड बाजार-रेवदंडा रोड-कुरूळ गाव-सहाणगोठी-शहीद निलेश तुणतुणे स्मारक, सहाणगोठीपर्यंत असा आहे. ही मिनी मॅरेथॉन पाच किलोमीटर अंतराची असून याकरिता १६ ते ३५ या वयोगटातील युवक-युवतींनी https://forms.gle/HBxJfp7h5BpuSHuW8 या लिंकद्वारे आपली नोंदणी करावी.

ऑनलाईन नोंदणीसंदर्भात अधिक माहितीकरिता क्रीडा अधिकारी सचिन निकम (८८५६०९३६०८) व प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी गोंधळी (९४२००५६७६२) यांच्याशी संपर्क साधावा तसेच रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांनी केले आहे.

# मांडवा येथे ११ ऑगस्टला राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील टाकादेवी क्रीडा मंडळ मांडवा यांच्या विद्यमाने नारळीपौर्णिमेच्या दिवशी गुरुवारी (दि. ११) राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. टाकादेवी स्पोर्ट्स क्लब व मांडवा ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी २.३० वाजता मांडवा बंदर या स्पर्धेचा थरार रंगेल.

या स्पर्धेसाठी तालुका, जिल्हा, राज्यातून नामवंत आखाड्यातील पैलवान उपस्थित राहणार आहेत. मांडवा येथील कुस्ती स्पर्धेची परंपरा गेल्या १०० वर्षांहून अधिकची आहे. सातत्याने येथे स्पर्धा होत असून गेल्या दोन वर्षे कोरोनामुळे त्यात खंड निर्माण झाला होता, परंतु या वर्षी भव्य अशा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी स्पर्धक तसेच विविध स्तरांतील मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत. या स्पर्धेवेळी कुस्तीप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन टाकादेवी स्पोर्ट्स क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

# संघर्षावर मात करून अचिंत शेउलीने उचलला 'सुवर्ण'भार



**हावडा : वृत्तसंस्था**

भारतीय वेटलिफ्टिंगपटू अचिंत शिउलीने बर्मिंगहॅम राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत ७३ किलो वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. अचिंतने स्नॅचमध्ये १४३ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये १७० किलो वजन उचलून इतिहास रचला. त्याच्या कामगिरीमुळे भारताला वेटलिफ्टिंगमध्ये तिसरे सुवर्णपदक मिळाले आहे. अचिंतवरती सध्या देशभरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. त्याचा इथपर्यंतचा संघर्ष थक्क करायला लावणारा आहे.

२० वर्षीय अचिंतचा प्रवास संघर्षांनी भरलेला आहे. २४ नोव्हेंबर २००१ रोजी पश्चिम बंगालमधील हावडा जिल्ह्यातील डुएलपूर येथे जन्मलेल्या अचिंताने बालपणी खूप संघर्ष केला आहे. त्याचे वडील सायकल रिक्षा चालवायचे. अचिंत आठव्या इयत्तेत असताना त्याच्या वडिलांचे निधन झाले. एवढेच नाही तर त्याचवेळी त्यांच्या पोल्ट्री फार्मवर जंगली कोल्ह्यांनी हल्ला केला. त्यामुळे त्याच्या कुटुंबाची प्रचंड वाताहत झाली. कुटुंबातील प्रत्येकाला घरखर्चासाठी काम करावे लागत होते. त्याची आई कपडे शिवण्याचे काम करू लागली. स्वत: अचिंतनेदेखील साड्यांना जरीकाम आणि भरतकाम केलेले आहे.

दरम्यान, वेटलिफ्टिंगमध्ये सोमवारी भारताची हरजिंदर कौरने ७१ किलो वजनी गटात कांस्यपदकाची कमाई केली. तिने एकूण २१२ किलो वजन उचलले. त्यामुळे सोमवारअखेर भारताच्या नावे एकूण सात पदकांची नोंद झाली.

# राष्ट्रकुल स्पर्धेत भारताच्या सुशीला देवीचे दुसरे 'रौप्य'





**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची शानदार कामगिरी सुरू आहे. सोमवारी (दि. १) स्पर्धेच्या चौथ्या दिवशी भारतीय महिला ज्युदोपटू सुशीला देवी लिकमाबाम हिने रौप्य, तर विजय कुमार यादवने कांस्यपदकाची कमाई केली. विशेष म्हणजे याआधीच्या राष्ट्रकुल स्पर्धेतही सुशीलादेवीने रौप्यपदक जिंकले होते.

सुशीला देवीला ४८ किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीत दक्षिण आफ्रिकेच्या मायकेला व्हाईटबोईकडून पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे तिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. विजय कुमार यादवने पुरुषांच्या ज्युदोमध्ये सायप्रसच्या पेट्रोस क्रिस्टोडौलाइड्सचा पराभव करीत कांस्यपदक जिंकले.

सुशीलाने यापूर्वीही राष्ट्रकुल स्पर्धेत पदक जिंकलेले आहे. २०१४मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतासाठी ज्युदोमध्ये पदक जिंकणारी ती पहिली भारतीय महिला ठरली होती. २०१४च्या ग्लासगो राष्ट्रकुल स्पर्धेतही सुशीलाने भारतासाठी रौप्यपदक जिंकले होते. तिने पुन्हा एकदा रुपेरी यश मिळविले आहे.

# शुबमन गिलच्या बहिणीने काढली सारा तेंडुलकरची डिजिटल दृष्ट!

## सोशल मीडियावर चर्चांना उधाण



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकांच्या आकर्षणाचा विषय असलेल्या स्टारकिड्सच्या यादीमध्ये मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची मुलगी सारा तेंडुलकरचाही समावेश होतो. एका इन्स्टाग्राम व्हिडिओवरील कमेंटमुळे सारा सध्या चर्चेत आली आहे. क्रिकेटपटू शुबमन गिलच्या कुटुंबातील एका व्यक्तीने साराच्या व्हिडिओवर ही कमेंट केली आहे.

साराने लाल रंगाच्या गाऊनमधील एक व्हिडिओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. तिचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. सारा लाल रंगाच्या गाऊनमध्ये इतकी सुंदर दिसत आहे की, क्रिकेटपटू शुबमन गिलच्या बहिणीनेदेखील यावर कमेंट केली आहे. विशेष म्हणजे शाहनील गिलने डिजिटल पद्धतीने साराची दृष्ट काढली.

शाहनील गिल सारा तेंडुलकरला इन्स्टाग्रामवर फॉलो करते. तू लाल रंगाच्या ड्रेसमध्ये, अशी कमेंट शाहनीलने केली आहे. त्यासोबत तिने इव्हिल आय इमोजी आणि एक पांढरा बदामही दिला आहे. शाहनीलच्या कमेंटवर अनेक यूजर्सनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

काहींनी शाहनीलला सारा तेंडुलकर आणि शुभमन गिलच्या रिलेशनशिपबद्दल प्रश्न विचारले, तर काहींना असे वाटते की, बहिणीच्या अकाऊंटवरून शुबमननेच ही कमेंट केली आहे. शुबमन आणि साराच्या नात्याबाबत वारंवार बातम्या येत आहेत, मात्र अद्याप दोघांनी काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com